**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया | अंक ४६ | बुधवार,दि.२० आक्टोबंर २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021

# नक्षली मंगरु मडावीला अटक



**गडचिरोली**:-जिल्ह्यातील पोलीस उपविभाग अहेरी अंतर्गत येणाऱ्या उपपोस्टे पेरमिली हद्दीत मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे पेरमिली जंगल परिसरात नक्षल विरोधी अभियान राबवितांना जहाल नक्षली मंगरु कटकु मडावी यास अटक करण्यात गडचिरोली पोलीसांना यश आले.

पोलीस अधिक्षक अंकित गोयल यांनी पत्रपरिषदेत दिलेल्या माहीतीनुसार मंगरु या नक्षलीवर यापुर्वी सामान्य निष्पाप नागरिकांच्या हत्या करणे तसेच पोस्टेवर हल्ले करण्यासारखे हिंसक गुन्हे दाखल असून त्याच्यावर २ लाखाचे बक्षिस ठेवण्यात आलेले होते.

नक्षल दृष्ट्या अतिसंवेदनशिल विसामुंडी पोमके नारगुंडा ता. भामरागड जि. गडचिरोली येथील रहीवासी असलेला मंगरु मडावी हा पेरमिली एलओएस मध्ये पेरमिली एलओएसच्या सदस्य पदावर भरती होवुन एक्शन टिम मेंबर म्हणुन कार्यरत होता. तसेच तो प्रतिबंधीत असलेल्या दंडकारण्य आदिवासी किसान मजदुर संघटनेचा वरिष्ठ कॅडर होता.

सन २०२१ मध्ये पोमके बुगी हद्दीत उपसरपंच रामा तलांडी याच्या खुनात तसेच पोमके बुगी पोस्ट अटॅकमध्ये त्याचा समावेश होता. त्याच्यावर ०३ खुन, ०१ चकमक असे एकुण ०४ गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याच्या नक्षली कारवाया व नक्षली प्रसारास आळा घालण्याकरीता महाराष्ट्र शासनाने त्याचेवर ०२ लक्ष रुपयाचे बक्षीस जाहीर केले होते. याव्यतिरीक्त त्याचा आणखी किती गुन्ह्यांमध्ये सहभाग आहे याचा तपास गडचिरोली पोलीस दल करीत असल्याची माहिती दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक (अभियान) सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन)समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक अहेरी, अनुज तारे यांचे नेतृत्वात पार पाडण्यात आली.

पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांनी नक्षलवादयांच्या हिंसक कारवायांवर अंकुश लावण्यासाठी नक्षलविरोधी अभियान तीव्र केले असुन नक्षलवादयांनी नक्षलवादाची हिंसक वाट सोडुन आत्मसमर्पण करुन सन्मानाने जीवन जगण्याचे आवाहन केले आहे.




# महाविकास आघाडी ओबीसीचे राजकीय आरक्षण पूर्ववत करणारच :- छगन भुजबळ

**गडचिरोली** – आदिवासी बहुल आठ जिल्ह्यातील ओबीसी वर्गाचे कमी झालेले आरक्षण आम्ही पूर्ववत केले. अनेक वर्षे ओबीसींवर अन्याय होत होता. मात्र महाविकास आघाडी सरकारने निर्णय घेतला समिती नेमली आणि या आठ जिल्ह्यातील ओबीसी आरक्षण पूर्ववत केले. आदिवासी बहुल जिल्ह्यातील ओबीसींच्या अर्धा टक्का आरक्षणाला देखील धक्का लावू देणार नाही असे प्रतिपादन राज्याचे अन्न व ग्राहक सरंक्षण मंत्री तथा समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष छगनराव भुजबळ यांनी केले.

येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद आयोजित कृतज्ञता सोहळा आणि ओबीसी मेळावा पार पडला. यावेळी माजी मंत्री आ.धर्मारावबाबा आत्राम,माजी खासदार मधुकरराव कुकडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष ईश्वर बाळबुधे,अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे कार्याध्यक्ष बापू भुजबळ, महाज्योतीचे संचालक प्रा.दिवाकर गमे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष रविंद वासेकर, कार्याध्यक्ष प्रकाश ताकसांडे,डॉ अशोक जीवतोडे, उपस्थित होते यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी माजी आमदार हरिराम वरखेडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये प्रवेश केला.

पुढे भुजबळ म्हणाले की,मंडल आयोग लागू व्हावा यासाठी आम्ही मोठा संघर्ष उभा केला. समता परिषदेने जालना येथे सभा घेतली त्या सभेला तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्यासह अनेक मोठे नेते उपस्थित होते. त्या सभेत आम्ही मागणी केली की मंडल आयोगाच्या शिफारशी महाराष्ट्रात लागू कराव्या त्याच सभेत पवार साहेबांनी आश्वासन देऊन एका महिन्याच्या आतमध्ये ओबीसी समाजाला आरक्षण मिळवून दिले.

ओबीसी समाजावर अनेक वर्षे अन्याय होत आला आहे. स्वातंत्र मिळाल्यानंतर देखील ओबीसी समाजाला आरक्षण मिळावे यासाठी अनेक आयोग नेमले मात्र त्यांच्या शिफारशी स्वीकारल्या नाही. काही काळानंतर मंडल आयोग नेमण्यात आला आणि त्याच्या शिफारशी स्वीकारण्यात आल्या. जनगणनेचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा समीर भुजबळ यांनी संसदेमध्ये भूमिका मांडली आणि जातनिहाय जनगणना करण्याची मागणी केली त्यांना शंभर खासदारांचा पाठींबा लाभला त्यात प्रामुख्याने भाजपचे तत्कालीन उपनेते कै. गोपीनाथराव मुंडे यांचा देखील सहभाग होता. पक्षादेशाची परवा न करता गोपीनाथराव मुंडे यांनी पाठिंबा दर्शविला त्यांनतर ग्रामविकास खात्यामार्फत जनगणना झाली.नंतरच्या काळात भाजपचे सरकार आले मात्र त्यांनी ती जनगणनेची आकडेवारी जाहीर केली नाही. आज ओबीसी वर्गाचे राजकीय आरक्षण स्थगित असताना आम्ही तीच आकडेवारी मागत आहोत मात्र केंद्र सरकार ती आकडेवारी देत नाही.

ओबीसींचे राजकीय आरक्षण महाविकास आघाडीने घालवले अशी टीका केली जाते मात्र आम्ही प्रयत्नांची शिकस्त करत आहोत. महाविकास आघाडी सरकार न्यायालयीन लढाई देखील लढत आहे. आणि इंपिरिकल डाटा द्यावा ह्या मागणीसाठी आम्हाला बाहेरील राज्यांचा देखील पाठींबा मिळत आहे.

केंद्र सरकारच्या विरोधात बोलले की केंद्रीय तपास यंत्रणांचा ससेमिरा पाठीमागे लावला जातो. दबाव टाकला जातो हा आवाज दाबण्याचा प्रयत्न आहे. जो केंद्राच्या चुकीच्या धोरणाच्या विरोधात बोलतो त्याला त्रास देण्याचे काम सुरू असल्याचे रोखठोक विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

# न.प.सभापतीच्या निवडणुकीत संधीसाधूमुळे भाजपचा पराभव-गटनेते पानतवणे



**गोंदिया** : दोन वर्षा पुवी गोंदिया राजकारणात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर झालेली उलथापालथचा परिणाम ८ ऑक्टोबर रोजी स्थानिक नगर पालिकेच्या विषय समितीच्या निवडणुकीमध्ये पाहावयास मिळाले. विशेष म्हणजे निवडणुकीच्या पथ्यावर भाजपमध्ये फुट निर्माण झाली असली तरी निवडणूक अधिनियमानुसार भाजपचे नगरसेवक आजही पक्षाचेच आहेत. मात्र काँग्रेसच्या चिन्हावर निवडूण आलेले तथा अनाधिकृत पणे भाजपचे ठरलेल्या नगरसेवकासह राष्ट्रवादी काँग्रेस तसेच नगरविकास आघाडी या तिघांनी एकत्र येवून नवीन समीकरणातून विषय समितीच्या निवडणुकीत भाजपला घरचा अहेर दिला.

नगर पालिकेच्या सभागृहात झालेला प्रकार हा भाजपमधील पक्षांतर घात आहे. पालिकेत नगराध्यक्ष भाजपचा व सभासद संख्या असतांनाही यापूर्वी पार पडलेल्या निवडणुकीत भाजपचे सभापती होते. मग आजच्या निवडणुकीत इतर पक्षांना समोर घेवून सभापतीवर त्यांची वर्णी लागली कशी, या बाबीचा आता भाजपच्या श्रेष्ठींनी मंथन करण्याची गरज आहे. तसेच पक्ष श्रेष्ठीकडे या प्रकरणाची तक्रार केल्याची माहिती आयोजित पत्र परिषद पालिकेतील भाजपचे गटनेते घनश्याम पानतवणे यांनी दिली.

यावेळी उपाध्यक्ष शिव शर्मा, नगरसेवक अफसाना मुजीब पठाण, दिपक कदम, कशीश जायस्वाल, राजेश बघेले, दीपक बोबळे आदी उपस्थित होते.

सोबतच या संधीसाधू लोकांमुळे पक्षाचे नुकसान होत असून यांना पक्षापेक्षा आपले हित अधिक महत्वाचे असल्याचे उघड झाल्याने जनतेने सुध्दा अशा संधीसाधू लोकांपासून भविष्यातील निवडणुकात सावध राहण्याची वेळ असल्याचे पानतवणे म्हणाले.काँग्रेसचे नगरसेवक भाजपमध्ये माझ्यासोबत असल्याचे ज्यांनी पक्षाला सांगितले,त्यांच्याच नगरसेवकांनी सुध्दा भाजपशी दगाबाजी करीत महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मदत करुन भाजपचा विश्वास गमावल्याचेही ते म्हणाले.

# श्रीरामपूरवासियांना मिळणार मालकी हक्काचे पट्टे-आ.रहांगडाले

**गोरेगाव**:-तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचनाची सोय उपलब्ध होणाच्या हेतूने कलपाथरी प्रकल्प निर्माण करण्यात आले.या प्रकल्पाच्या कामाकरिता जमीन संपादित केलेल्या नागरिकांना गोरेगाव न.प.क्षेत्रातील श्रीरामपूर पुनर्वसन येथे पट्टे वाटप करण्यात आले. मात्र सदर जागा आजही मध्यम प्रकल्प लघु पाटबंधारे विभागाचे नावे नोंद असून मालकी हक्काचे पट्टे वाटप न झाल्यामुळे पुनर्वसित जागा नगरपंचायतीला हस्तांतर करण्यात अडचणी येत आहेत.त्यामुळे पुनर्वसीत नागरिकांच्या नावे पट्टे करुन सात बारा देण्याबाबत तहसील कार्यालय येथे आमदार विजय रहांगडाले यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली.

यावेळी १५ दिवसात सदर प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश तहसिलदारांना देत नगर पंचायत क्षेत्रात पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्याकरिता नवीन डीपीआर तयार करण्याच्या सुचना दिल्या.नगर पंचायत क्षेत्रातील आबादी जागेवर अतिक्रमण केलेल्या ८४ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना पट्टे देणे,दिव्यांगाकरिता साहित्य खरेदी करणे,सीसीटीव्ही बसविण्याकरिता प्रस्ताव पाठविणे, नगरपंचायत प्रशासकिय इमारतीचा प्रस्ताव पाठविणे यावर चर्चा करण्यात आली.

बैठकीला उपविभागीय अधिकारी



अजय नष्टे, तहसीलदार सचिन गोस्वामी,माजी न.प.अध्यक्ष आशिष बारेवार,विश्वजीत डोंगरे, हिरालाल रहांगडाले, रेवेन्द्र बिसेन,डॉ.लक्ष्मण भगत, महामंत्री ईश्वर सोनेवाने, संजय बारेवार,मुख्याधिकारी नंदनवार, मजीप्रा कार्यकारी उपभियंता भांडारकर, प्र.भूमी अभिलेख तालुका उपाधीक्षक अजय क्षीरसागर,राष्ट्रीय महामार्ग क.अभियंता दीपक चव्हाण उपस्थित होते.

# कुथे,मेश्राम,तिवारी, देशमुख,मालती कापसे सभापतीपदी विजयी



**गोंदिया** – नगर पालिकेच्या सभागृहात पार पडलेल्या विषय समिती पदाच्या निवडणुकीसाठी भाजपतर्पेफ बांधकाम सभापती पदासाठी घनश्याम पानतवणे, नियोजन विषय समितीच्या सभापती पदासाठी जितेंद्र (बंटी) पंचबुद्धे, पाणी पुरवठा विषय समितीच्या पदासाठी हेमलता पतेह तसेच महिला बालकल्याण विषय समितीच्या सभापती पदासाठी आशालता चौधरी तर शिक्षण व क्रिडा विषय समिती पदासाठी अफसाना मुजीब पठाण यांनी नामांकन दाखल केले. तर दुसरीकडे भाजपकडे बहुमत असल्याने हे उमेदवार निवडूण येतील असा अंदाज वर्तविला जात होता. परंतु राकाँ, काँग्रेस व नगरविकास आघाडी यांना एकत्रीत करून याच पदासाठी अनुक्रमे राजु कुथे, सतिश देशमुख, भागवत मेश्राम, मालती कापसे व सुनिल तिवारी यांनी निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल केला. सभागृहातील सर्व गटनेत्यांना विषय समितीच्या सदस्य पदावर प्रमाणानुसार सदस्य म्हणून नगरसेवकांचे नाव सुचविण्याचे अधिकार असते. या प्रमाणे भाजपचे गटनेते घनश्याम पानतवणे यांनी १८ नगरसेवकांची वेगवेगळ्या विषय समितीमध्ये नियुक्तीचे पत्र दिले. या प्रमाणे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सर्व पक्षांच्या गटनेत्यांकडून मिळालेल्या पत्रानुसार विषय समिती गठीत केली. सभागृहातील विषय समितीच्या सदस्य संख्येच्या आधारावर भाजपच्या उमेदवारांना मते मिळाली मात्र राष्ट्रवादी, काँग्रेस आणि नगरविकास आघाडीने नव्या समीकरणातून सभापती पदाच्या निवडणुकीत भाजपच्या उमेदवारांना पराभूत केले.

बांधकाम विषय समितीच्या सभापतीपदी राजकुमार कुथे, नियोजन समितीच्या सभापतीपदी सतिश देशमुख, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या सभापतीपदी भागवत मेश्राम, महिला बालकल्याण समितीच्या सभापतीपदी मालती कापसे, शिक्षण व क्रीडा समितीच्या सभापतीपदी सुनिल तिवारी यांची वर्णी लागली.

# परसवाडाच्या जिप हायस्कूलमध्ये ९ पदे रिक्त

**तिरोडा** – जिल्हा परिषद गोंदिया शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या तिरोडा तालुक्याच्या परसवाडा येथील जिल्हा परिषद हायस्कूल ही मोठी शाळा आहे. मात्र यात शिक्षकांची तब्बल ९ पदे रिक्त आहेत. तसेच प्रशासकीय बदलीवर आलेले शिक्षक के.के. मेश्राम यांची प्रतिनियुक्ती दुसऱ्या शाळेत करण्यात आल्याने पुन्हा शिक्षकांची संख्या घटली आहे. जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग कुंभकर्णी झोपेत असून शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे.



परसवाडा येथील जिल्हा परिषद शाळेत वर्ग ५ ते १२ वीपर्यंतचे परिसरातील विद्याथी येऊन शिक्षण घेतात. या शाळेत हजारच्या जवळपास विद्याथीसंख्या आहे. पण या शाळेकडे जिप शिक्षणाधिकारी हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. या शाळेत गणित, इंग्रजी, मराठी, विज्ञान व इतिहास या विषयांचे शिक्षक नाहीत. वर्ग ६ ते ८ वी या तुकड्यांवर तीन पदे रिक्त आहेत. वर्ग ९ ते १० वीच्या तीन शिक्षकांची पदे रिक्त आहेत. तर वर्ग ११ ते १२ वीच्या तीन शिक्षकांची पदे रिक्त आहेत. विज्ञान विषयाच्या शिक्षकांची पूर्ण पदे रिक्त आहेत.

सुकडी-डाकरामच्या जिप शाळेतून प्रशासकीय बदली होऊन आलेले के.के. मेश्राम हे ३१ जुलैला परसवाडाच्या जिप शाळेत रुजू झाले होते. ते गणित शिक्षक असून त्यांना रिक्त जागेवर समाविष्ट करण्यात आले होते. पण त्यांना उलट त्याच सुकडी-डाकराम जिप शाळेत प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आहे. पदे रिक्त असूनही त्यांची प्रशासकीय बदली केली कशी? हा प्रश्न समोर आला आहे. त्यांनी ८५ हजार रुपये शासनाचे वाहतूक सामान लगेच बिलाचीही उचल केली आहे. शाळेत फक्त रुजू झाले व काही दिवस आले. त्यावेळी शाळा बंद होत्या. यात तत्कालीन शिक्षणाधिकारी हिवारे यांनी शिक्षण विभागात घोळ केल्याचे बोलले जात आहे.

**बेरोजगार युवकांकडून विद्यार्थी शिकून घेतात गणित**

सध्या कार्यरत शिक्षणाधिकारी यांच्या दुर्लक्षित धोरणामुळे जिप शाळांतील विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारमय होत आहे. गणित, सायन्स, इंग्रजी यासारख्या विषयांचे शिक्षक शाळेत नसतील तर विद्यार्थी समोर भविष्यात काय करणार?हेच अधिकारी मोठ्या नाकाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगतात की स्पर्धेत सहभागी व्हावे. युग स्पर्धेचे आहे. ज्या ठिकाणी शिक्षक नाही त्या विद्यार्थ्यांचे काय होणार? विद्यार्थी मुख्याध्यापकांना विचारतात, गणित शिक्षक कधी येणार? अभ्यासक्रम कधी पूर्ण होणार? गाव परिसरातील बेरोजगार युवकांकडून विद्यार्थी गणित विषय समजावून घेत आहेत. पण शिक्षण विभाग कुंभकर्णी झोपेत आहे.

**गणित शिक्षक मेश्राम यांना परत आणा**

याकडे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष देऊन ग्रामीण भागातील गरीब, शेतकरी, शेतमजूर यांच्या मुलांच्या शिक्षणाकडे, विद्यार्थ्यांच्या भविष्यकडे लक्ष द्यावे. त्यासाठी शिक्षक के.के. मेश्राम यांना सुकडी-डाकराम येथून परसवाडा येथे ङ्कजेसै थेङ्क परत आणावे. अशी मागणी परिसरातील विद्यार्थ्यांचे पालक,भाजप तालुका ओबीसी आघाडी तथा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष हुपराज जमईवार यांनी केली आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्द बदलाला ब्रेक



**गोंदिया** – निवडणुकीपूवी नगर विकास मंत्रालय असो की ग्राम विकास मंत्रालयाच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या हद्दीमध्ये फेरबदलची प्रक्रिया होत असते. या संदर्भात निवडणूक विभाग अनभिज्ञ असतो. परिणामी होणाया निवडणुकीत व निवडणुकीनंतर बाधा निर्माण होत असते. एवढेच नव्हेतर अनेक न्यायालयीन प्रकरणांना समोर जावे लागले. या प्रकारावर आळा घालण्यासाठी आता निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या हद्द फेरबदल प्रक्रियेला ब्रेक लावले आहे.

किमान सहा महिन्यापूवी फेरबदल करावे, अशा सूचनाही निवडणूक आयोगाने राज्य शासनाला दिले आहेत.

गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर पंचायत, नगर परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी काळात निवडणूक होणार आहेत. यातील अनेक संस्थांची मुदत जुलै-२०२० पूवीच संपली आहे. यामुळे निवडणूक अधिनियमानुसार या संस्थांच्या निवडणूका घेण्याकरीता निवडणूक विभाग कामाला लागला आहे.

यानुरूप जुलै -२०२० मध्ये प्रभाग रचनेसह क्षेत्र रचनाही करण्यात आली. मात्र, त्यानंतर कोरोना संसर्गाने निवडणूका लांबल्याने काही दिवसापूवीच राज्य शासनाने प्रभाग रचनेसह क्षेत्र बदलाचा निर्णय घेतला. यामुळे निवडणुका लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली. तसेच या विषयाला घेवून न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा आसरा घेत राज्य निवडणूक आयोगाने राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाला पत्र पाठवून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमध्ये कोणतेही बदल केले जाणार नाही. असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. यामुळे नागरी व ग्रामीण क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये आता बदल होणार नाही.

**क्षेत्र बदलातील सालेकसा नगर पंचायत पेचात**

**सहा वर्षांपूवी राज्य शासनाने तालुका गावांना नगर पंचायतीत रूपांतर करण्याचा निर्णय घेतला. यानुरूप तालुक्याच्या गावांना नगर पंचायतीचा दर्जाही देण्यात आला. त्या अनुषंगाने निवडणूका पार पडल्या. पण सालेकसा नगर पंचायतीला लागून असलेल्या आमगाव खुर्दचा समावेश नगर पंचायतीत न झाल्याने निवडणुकीवर बहिष्कार घालण्यात आला. कालांतराने न्यायालयीन प्रकियेच्या माध्यमातून आमगाव खुर्दचा समावेश नगर पंचायतीत करण्यात आला. त्यानंतर नगर पंचायत बर्खास्त करून नव्याने निवडणूका घेण्यात याव्या, अशी मागणी करण्यात आली. मात्र, क्षेत्र बदल निवडणुकीनंतर झाल्याने त्या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आले. परिणामी आज सहा वर्षाचा कार्यकाळ लोटल्यानंतरही आमगाव खुर्द निवडणूक प्रकियेपासून वंचित राहिला.**

**आमगाव नगर परिषदेला क्षेत्र बदलाचा फटका**

**सहा वर्षांपूवी आमगावचे नगर पंचायतीत रूपांतर करण्यात आले. दरम्यान, आमगाव लगतच्या आठ गावांचा समावेश करून नगर परिषद करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली व त्याला मंजूरीही मिळाली. मात्र, हे क्षेत्र बदलाचे प्रकरण न्यायालयात गेले व नगर पालिका कि नगर पंचायत असा वाद निर्माण झाला. तेव्हापासून आजपर्यंत आमगावात प्रशासक राज सुरु आहे. येत्या काही महिन्यात निवडणुका होणार आहेत. मात्र, त्या निवडणूक कार्यक्रमातूनही आमगाव बाद राहणार, असे चिन्ह दिसून येत आहेत.**

# अर्जुनी मोरगावात आढळला राज्य फुलपाखरू

**अर्जुनी मोरगाव** – फुलपाखरांच्या विविध प्रकारच्या प्रजाती असतात.राज्य फुलपाखरू असतो याची माहिती अनेकांना नसते.मात्र निलवंत (ब्ल्यू मॉमीन) हा आपला राज्य फुलपाखरू आहे.विदर्भात अत्यंत कमी दिसणारा हा राज्य फुलपाखरू अर्जुनी मोरगाव येथे दिसून येत आहे.येथे हा आकर्षक फुलपाखरू दिसून येत असल्याने निसर्गप्रेमींमध्ये कुतूहल व्यक्त केले जात आहे. फुलपाखरू हा जैवविविधतेतील महत्वपूर्ण घटक व वनस्पतींसह परस्परसंबंध असलेला कीटक आहे.निलवंत नावाच्या फुलपाखराला जून २०१५ मध्ये महाराष्ट्र शासनाने राज्य फुलपाखरू म्हणून घोषित केले.अशी फुलपाखराची राज्य फुलपाखरू म्हणून निवड करणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य आहे.



जगभरात १७८२०,भारतात १५१० तर महाराष्ट्रात सुमारे २४० ते २५० फुलपाखरांच्या प्रजाती आहेत.देशातील १५ टक्के फुलपाखरे महाराष्ट्रात आढळतात. निसर्गात फुलपाखरांची भूमिका महत्त्वाची असते.निलवंत हे फुलपाखरू श्रीलंका तसेच भारतातील महाराष्ट्र, दक्षिण भारत व पूर्व समुद्र किनारपट्टीच्या क्षेत्रात आढळतो.उत्तरेला गुजरात पर्यंत सापडल्याच्या नोंदी आहेत.ब?याचदा बागांमध्ये किंवा मुंबई, पुणे,बंगलोर या शहरातील वाहतुकीच्या गदीत आढळतो. मसदर्न बर्डविंगफ या फुलपाखरानंतरचे हे दुसरे सर्वात मोठे फुलपाखरू आहे.विदर्भात काही प्रमाणात या फुलपाखरांचे अस्तित्व असले तरी विशेषतः ताडोबा,नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली व चिखलदरा या भागातच त्याची नोंद असल्याचे दिसून येते. मात्र अर्जुनी मोरगाव येथील हौशी निसर्गप्रेमी प्रा अजय राऊत व डॉ शरद मेश्राम यांनी हा फुलपाखरूस्थानिक सिव्हिल लाईन व एस एस जे महाविद्यालय परिसरात बघितला आहे.

**ओळख फुलपाखराची**

निलवंत फुलपाखरू क्वचितच आढळतो. रंग मखमली काळा,पंखाच्या वरच्या भागाला निळसर पट्टे,खालच्या भागाला निळ्या रंगाच्या ठिपक्यांची गदी असते.मादीच्या पंखांच्या खालच्या भागाला गर्द लाल रंगाचे पाच ते सात ठिपके,पंखांची खालची बाजू काळ्या रंगाची असते.आपल्या आकर्षक रंगांनी लक्ष वेधून घेणारा हा फुलपाखरू आहे.फुलांच्या मकरंदातून न मिळणारी आवश्यक पोषकद्रव्ये मिळवण्यासाठी ही फुलपाखरे चिखल,कुजलेले पदार्थ यावर बसलेली दिसतात. जंगलातील वाटा व झरे यावरही आढळतात. याच्या नराला सूर्यप्रकाश आवडतो.तो सावली टाळतो.अशोक, मोगरा कुलातील फुले,झिनिया या फुलांना हे फुलपाखरू सतत भेटी देतात

**प्रा अजय राऊत, प्रा डॉ शरद मेश्राम**

## संपादकीय

# ओबीसी.चे रक्षण आणि आरक्षण

भारताची पूर्वी कृषीप्रधान देश अशी ओळख होती.आता भारत समस्याप्रधान देश म्हणून ओळखल्या जावू लागला आहे.अनेक समस्यांनी समाजमन खदखदू लागले आहे.एकूणच सामाजिक पर्यावरणात कमालीचा ताण वाढू लागला आहे. जुने प्रश्न अजून सुटले नाहीत. नवीन प्रश्न आणखी गुंता वाढवू लागले आहेत. यातील बहुतेक प्रश्नांची मुळं येथील धर्मव्यवस्थेशी जुळलेली आहेत. वर्णाधिष्ठित वैदिक हिंदुधर्मव्यवस्थेने असंख्य जाती निर्माण करुन अखंड व एकात्म भारताला छिन्नविछिन्न केले आहे. हा जातिसंस्थेचा क्रॉनिक आजार आजही देशाला पोखरून काढत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या रुपाने या आजारावर अतिशय जालीम औषध दिले आहे. परंतु धर्मांध वृत्तीमुळे व राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे हे औषध निष्प्रभ ठरू लागले आहे.विशेषत: जो समाजघटक अधिक आजारग्रस्त आहे तोच हे औषध घेण्याचं टाळतो आहे.त्यामुळेच या आजाराने आता गंभीर स्वरूप धारण केले आहे. या आजाराने सर्वाधिक ग्रस्त असलेला ओ.बी.सी.समाज हा संख्यात्मक दृष्ट्या निर्णायक आहे. या देशात हवा तसा बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य या समाजघटकात आहे. परंतु त्याला त्याच्या सामर्थ्याची जाणीव नाही. त्यामुळेच तो आज लाचार बनून सत्ताधाऱ्यांच्या दारात आरक्षणाची भीक मागत उभा आहे. विषमतावादी वैदिक हिंदुधर्म हेच आपल्या अधोगतीचे मूळ कारण आहे. हे वास्तव समजून घेणे आजही त्याच्या धर्मश्रद्ध विचारशक्तीच्या आवाक्याबाहेर आहे. या अविवेकी धर्मश्रद्धेमुळेच बहुजन समाज धर्मव्यवस्थेच्या पिंजऱ्यात कैद झाला आहे. वैदिक हिंदुधर्मव्यवस्थेने या समाजघटकाची विचारशक्ती क्षीण केली आहे. ही विचार दुर्बलताच या समाजाच्या उन्नयनास मारक ठरु लागली आहे. ओ.बी.सी.-बहुजन समाजाला वैदिक हिंदुधर्मव्यवस्थेच्या पिंजऱ्यातून बाहेर काढण्यासाठी आधुनिक भारतात महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मयोगी गाडगेबाबा इत्यादी समाजचिंतकांनी आटोकाट प्रयत्न केले. धर्मव्यवस्थेवर कठोर प्रहार केले. तरीही हा मतिमंद समाज फारसा गतिमान होवू शकला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात तर एकूणच बहुजन समाजाच्या कल्याणाविषयी अपार करुणा होती. तळमळ होती. या खेड्या-पाड्यात राहणाऱ्या, शेती-मातीत राबणाऱ्या आणि धर्मव्यवस्थेच्या दलदलीत फसलेल्या बहुजन समाजाला बाहेर काढण्यासाठी त्यांच्या मनाची फार तगमग सुरू होती. त्यासाठी त्यांनी आपली संपूर्ण राजकीय शक्ती-युक्ती पणाला लावली.तथागत बुद्धाच्या करुणेने व्यापलेल्या त्यांच्या मनात सर्व भारतीयांविषयी समतेचा व ममतेचा बंधुभाव होता. अनेक धर्म, पंथ,वर्ण,वर्ग,जाती, लिंग, भाषा, प्रदेश, संस्कृती अशा विविधतेने छिन्नविछिन्न झालेल्या भारताला एकसंध करणे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवापुढे फार मोठे आव्हान होते. परस्परांच्या हितसंबंधांना छेद देणारे भेद विसर्जित करून नवभारताच्या उभारणीचे अतिशय व्यापक व उदात्त ध्येय त्यांच्या क्रांतदर्शी दृष्टिपुढे होते. वैदिक हिंदुधर्मव्यवस्थेने ज्या ज्या समाजघटकांना शिक्षण, सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठेपासून शतकानुशतके दूर ठेवले होते.त्या सर्व उपेक्षित, वंचित घटकांना नवराष्ट्र उभारणीच्या अभियानात सामील करून घेणे.आणि सर्वांचे समुन्नयन करून देशात समता स्थापित करणे त्यांचे महान ध्येय होते. या ध्येयपूर्तीसाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदुधर्माच्या शूद्र वर्णातील विखुरलेल्या असंख्य जाती-पोटजातींना एकत्रित केले. त्यांचे ओ.बी.सी. ( इतर मागासवर्गीय जाती) असे नामकरण केले. हे केवळ नामकरण नव्हते. तर, अस्मिता हरवलेल्या व अस्तित्व गमावलेल्या जातींचे शक्तिशाली पुनर्गठन होते. या पुनर्गठीत जातिसमुहांना शक्तिशाली करण्यासाठीच त्यांनी भारतीय संविधानात प्राधान्यक्रमाने ३४० वे कलम समाविष्ट केले. या कलमान्वये डॉ.आंबेडकर यांनी ओ.बी.सीं.च्या सर्वांगीण उन्नतीची संवैधानिक तरतूद केली.त्यासाठी त्यांना तत्कालीन उच्चवर्णीय नेत्यांशी संघर्षाची भूमिका घ्यावी लागली.मनस्ताप सहन करावा लागला. एवढं सगळं करूनही तेव्हाचा आणि आजचाही ओ.बी.सी.समाज बाबासाहेबांचे मन समजून घेवू शकला नाही,हे खेदाने नमूद करावे लागते.

संवैधानिक अधिकाराचे शस्त्र हाती दिले की,ओ.बी.सी.समाज आपल्या अधिकारांची लढाई लढण्यास संघटितपणे सज्ज होईल. अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची रास्त अपेक्षा होती. परंतु धर्मधुंद ओ.बी.सी.-बहुजन समाज धर्मव्यवस्थेच्या प्रभावातून मुक्त होवू शकला नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका व्यवस्थित समजून घेवू शकला नाही. आणि आपल्या अधिकारांसाठी कधी लढूही शकला नाही. ओ.बी.सी.-बहुजन समाज हा स्वतःच्या गुलामीचे ओझे वाहणारा जगातील एकमेव समाज आहे.तो आजही धर्मव्यवस्थेच्या चाकोरीबाहेर पडायला तयार नाही. त्याला स्वतःच्या अधिकारांशी काही देणे घेणे नाही. आपल्या संवैधानिक अधिकारांची शिफारस करणाऱ्या 'मंडल आयोगा' ची लढाई लढायला सुद्धा हा समाज जागृतपणे रस्त्यावर उतरू शकला नाही. मंडल आयोगा विषयी समाजजागृती करण्यात, रस्त्यावरची लढाई लढण्यात व राजकीय भूमिका घेण्यात आंबेडकरवादी संस्था, संघटना व राजकीय पक्षांचे फार मोठे योगदान आहे.आंबेडकरी समाज हा सुरुवातीपासूनच ओ.बी.सी.-बहुजन समाजाचा हितचिंतक राहिला आहे. परंतु आजही बहुजन समाज आंबेडकरी चळवळीशी विचाराने व मनाने फारसा जुळू शकला नाही. आणि या समाजाकडे व विचारधारेकडे बघण्याची आपली दूषित दृष्टी बदलू शकला नाही. जातीचे खुळ आजही बहुजन समाजाच्या डोक्यातून फारसे निघू शकले नाही. बहुजन समाजातील अनेक शिक्षित, उच्चशिक्षित लोक आत्ता कुठे दचकत बिचकत स्वतः ला ओ.बी.सी.म्हणू लागले आहेत. परंतु आपण मागासवर्गीय आहोत हे खुलेपणाने मान्य करण्याचे टाळत आहेत. आपण वर्णव्यवस्थेतील शूद्र म्हणजे सर्वार्थाने मागासवर्गीयच आहोत. हे जातिवास्तव समजून घेण्यात आजही बहुजन समाजाचा जाती अहंकार अडसर ठरत आहे. या जाती अहंकाराने भारतीय समाजकारणात व राजकारणात अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. ओ.बी.सी- बहुजन समाजाच्या धर्मांध वृत्तीनेच या देशाची सत्तासूत्रे त्यांच्याच हितशत्रूंकडे सोपविली आहेत.ओबीसी समाजाला मंडल आयोगाने आरक्षणाचे सुरक्षा कवच दिले आहे. हे कवच भेदण्यासाठीच संघ-भाजपाने हे राममंदिर उभारणीचे अभियान सुरू केले आहे. आणि या अभियानात धर्मश्रद्ध व विचारशून्य ओबीसी समाज मोठ्या आनंदाने सामील झाला आहे. या समाजाला एकीकडे धार्मिक गुलामीही हवी आहे आणि दुसरीकडे संवैधानिक अधिकारही हवे आहेत.त्यासाठीच हा समाज आता आदळ-आपट करू लागला आहे. ज्यांना यांनी आपल्या धर्मभावनेच्या पायघड्या घालून सत्तास्थानी पोहोचविले. तेच आता यांच्या अस्तित्वावर उठले आहेत. सत्तेत येताच ओ.बी.सी. विद्यार्थ्यांचे वैद्यकीय क्षेत्रातील आरक्षण संपुष्टात आणले आहे. राजकीय क्षेत्रातील आरक्षण संपविले आहे.ओबीसीची जातिनिहाय जनगणना करण्यास नकार देत आहेत. एकूणच बहुजनांच्या शिक्षणाचा मार्ग अवरुद्ध करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण लागू केले आहे. भारतातील बहुतेक सर्व शेतकरी शूद्रातिशूद्र आहेत.या शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्यासाठीच अन्यायी स्वरुपाचे नवीन कृषीकायदे आणले आहेत.आत्ता कुठे ओबीसी जागा होवू लागला व आपल्या हक्काचे आरक्षण मागू लागला आहे. आणि नेमका या सत्तास्वामींनी खाजगीकरणाचा सपाटा लावून शासकीय, निमशासकीय क्षेत्रातील नोकऱ्या संपविल्यात.हे सर्व सहज व स्वाभाविकपणे घडलेले नाही.तर,नियोजनपूर्वक घडवून आणण्यात आले आहे. उच्चवर्णीयांकडे राष्ट्रीय साधनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणात केंद्रिकरण होत आहे. संवैधानिक तरतुदींना छेद देवून प्रशासनातील सर्वोच्च पदांवर उच्चवर्णीयांच्या नियुक्त्या केल्या जात आहेत.त्यातून मनुवादी धर्मसत्ता बळकट होवू लागली आहे. तर, दुसरीकडे या देशातील शेतकरी,शेतमजूर,कामगार,हातमजूर,फेरीवाले,रिक्षाचालक,टॅक्सी चालक,छोटे वाहतुकदार,हातगाडीवाले,अस्थायी धंदा करणारे,छोटे-मोठे कारागीर,सफाई कामगार, भटके-विमुक्त, अल्पसंख्याक, आदिवासी, अल्पशिक्षित, उच्चशिक्षित तरुण निर्धन, निराधार, अधिकार वंचित व वेठबिगार होवू लागले आहेत. देशात एका बाजूला सामाजिक विषमता आहेच. दुसरीकडे आर्थिक विषमतेची दरी रुंदावत चालली आहे. देशात आता अभिजन विरुद्ध बहुजन असे चित्र आकार घेऊ लागले आहे. आणि हे चित्र जेवढे ठळक व स्पष्टपणे साकार होत जाईल तेवढेच, पुढील प्रश्न सोडविणे सोपे नि सोयिस्कर होणार आहे.ओबीसीची टक्केवारी सर्वाधिक,त्यामुळे ओबीसी समाजाची जबाबदारीही मोठी असणार आहे.ओबीसीतील छोट्या-मोठया जातसमूहांनी सर्वप्रथम आपसातील धर्मभेद व जातिभेद विसर्जित केला पाहिजे. अविवेकी धर्मश्रद्धेची झापडं बाजूला सारून डोळसपणे विवेकाची वाट धरल्याशिवाय ओबीसीना सत्याचे आकलन होणार नाही.वास्तवाचे भान येणार नाही.भविष्यातील धोके लक्षात येणार नाहीत. महत्वाचे म्हणजे एकूणच बहुजनांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या दिशादर्शक बोटाचा अर्थ नीट समजून घेण्याची आणि पुढील लढ्याची दिशा निश्चित करण्याची वेळ आली आहे. सत्ताप्राप्तीच्या दृष्टीने एकजूट होण्याची व लोकसंसदेच्या दिशेने आगेकूच करण्याची वेळ आली आहे.आत्ता कुठे ओबीसी हक्काची भाषा बोलू लागला आहे. आरक्षणाची मागणी करू लागला आहे. ही अभिजनांच्या दृष्टीने धोक्याची घंटा आहे.ओबोसी समाजघटक आपल्या मगरमिठीतून निसटतो की,काय? अशी स्थिती निर्माण झाली आहे.म्हणून धर्माधिष्ठित राज्यव्यवस्थेने 'मंदिर निर्माण प्रकल्प' सुरू केला आहे.ओबीसीना हक्काचे आरक्षण देण्याची वेळच येऊ नये म्हणून रोजगार पुरविणाऱ्या सर्व पायाभूत शासकीय संस्था डबघाईस आणने आणि कवडीमोल भावाने विकणे सुरू आहे.ओबीसीना देण्यासाठी सरकारकडे काहीही शिल्लक राहू नये. असे हे दूरदर्शी नियोजन आहे. हे लक्षात घेऊनच सर्व लढाऊ, समविचारी व संविधाननिष्ठ समाजघटकांना सोबत घेऊन बहुजन विरुद्ध अभिजन असा निर्णायक लढा

उभारावा लागणार आहे.सत्तेबाहेर राहून भीक मागणे खूप झाले. आता सत्ताधारी बनून भीक देण्याची योजना आखली पाहिजे.जिसकी जितनी संख्या भारी,उसकी उतनी भागिदारी!हे तत्वप्रमाण मानून अंमलात आणले पाहिजे.शासन आणि प्रशासनात जे अभिजन महत्त्वाच्या जागा अडवून बसले आहेत. त्यांना त्यांची खरी जागा दाखवली पाहिजे.खाजगीकरणाचा डाव खेळून ज्या नोकऱ्या भांडवलदारांच्या तिजोरीत कुलुपबंद करण्यात आल्या. ते कुलुप सत्तेच्या चाबीने उघडून खाजगीकरणातही आरक्षणाचे तत्त्व लागू करावे लागेल. बहुजनांच्या शैक्षणिक विकासाला अधिक प्राधान्य द्यावे लागेल. तेव्हाच भारतात खऱ्या अर्थाने शिक्षण, सत्ता,संपत्ती व प्रतिष्ठेचे समान वाटप होवू शकेल.आणि भारतीय संविधानाचे ध्येय साकार होवू शकेल.त्यासाठी भारतातील निर्णायक संख्याबळ असणारा ओबीसी समाज जागा झाला पाहिजे.त्याने धर्मांधतेचे जोखड झुगारून दिले पाहिजे. आणि संघटीत होऊन भारतीय संविधानाचे रक्षण केले पाहिजे. संविधानाच्या रक्षणातच ओबीसीचे रक्षण आणि आरक्षण सामावलेले आहे! डॉ.मनोहर नाईक, नागपूर

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# रावण दहन कुप्रथा बंदी कायदा अस्तित्वात येईपर्यंत लढा कायम राहणार



**गोंदिया** – आर्य लोकांनी नेहमी अनार्य आदिम लोकांना राक्षस, असुर,वानर म्हणून हिणवले आहे. आदिवासी लोकांच्या साध्या भोळ्या वृत्तीचा फायदा घेवुन त्यांच्या संरक्षकाला गुन्हेगार दाखवून त्यांच्याच हस्ते जाळून घेण्याची मोठे कपट कारस्थान केले आहे. आपण पान वाचण्यातच कमी पडत असल्याने खोट्या मनुवादी इतिहासकारांचे मतांचे गुलाम होवून बसले आहोत. पण आता अस चालणार नाही.

मनोरंजनासाठी खोट्या कूप्रथेच्या नावा खाली महान राजा रावणाचा अपमान करून विंटबना करणे हा गुन्हा आहे. रावण दहन या कुप्रथेला प्रखर विरोध व्हायलाच हवे. जो पर्यंत रावण दहन कूप्रथा बंदी कायदा अस्तित्वात येत नाही तो पर्यंत आपण लढा कायम राहिल. ऐतिहासिक माहितीच्या आधारे कायद्यान्वये प्रयत्न आपला राहणार व त्याकरिता आपली लढाई निरंतर राहील असे ठळक विचार कोयावंशी गोंड राजा रावण यांच्या स्मृती प्रित्यर्थ आयोजित चर्चा संगोष्ठी कार्यक्रम प्रसंगी उपस्थीत मान्यवरानी व्यक्त केले. बिरसा क्रांती दल, राणी दुर्गावती आदिवासी महिला मंडळ, संविधान मैत्री संघ व नेशनल आदिवासी पीपल्स फेडरेशन च्या वतीने स्थानिक आदिवासी कॉलोनी परमात्मा एक नगर कुडवा रोड येथे आयोजित या चर्चा संगोष्ठी कार्यक्रमाची सुरुवात धरती आबा बिरसा मुंडा व वीरांगना राणी दुर्गावती यांच्या छायाचित्रावर माल्यार्पण करुन झाली. प्रसंगी दीप प्रज्वलन करुन आदिम कालीन गोंड पद्धतीने न्यायप्रीय राजा रावणाची पुजा करण्यात आली. या कार्यक्रमाची अध्यक्षता एल टी पंधरे यानी केली तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून संविधान मैत्री संघाचे अतुल सतदेवे, मातंग समाज संघ प्रमुख वसंत गवळी, घनश्याम तोडसाम, धनराज तुमडाम, ओबिसी संघर्ष कृती समितीचे कैलाश भेलावे, सुनिल भोंगाडे, प्रमुख अतिथी म्हणून बिरसा क्रांती दलाचे मालती किन्नाके, राणी दुर्गावती मंडळचे गीताताई सलाम, नेशनल आदिवासी फेडरेशनच्या प्रमिला सिंद्रामे, ईश्वर पंधरे, डॉ.मनीष पंधरे आदि उपस्थीत होते. कार्यक्रमाचे संचालन नीलकंठ चिचाम व उपस्थितांचे आभार प्रदर्शन शत्रुघ्न मरस्कोल्हे यानी मानले. गीता तुमडाम, तुष्मा तोडसाम, हेमलता आहाके, मिनाक्षी वट्टी, बिन्दू कोडवते, सीमा उइके, मनिषा कुंभरे, भावना उइके, सरिता भलावी, लता मडावी, शोभा कुसराम, मंजू उइके, रंजना उइके, बबिता कुंभरे, वनिता सलामे, छाया दुर्गे, अनिता नागभिरे, संगीता पुसाम, अनिता टेकाम, ममता नागभिरे, मंदा मडावी, योगिता गेडाम, नमिता फुलसुंगे, लता सयाम, कविता अडमाचे, सुनिता पुसाम, पिंकी कुंभरे, दिव्या उइके, आदित्य सलाम, सुमीत उइके, लोकेश कुसराम, पंकज कुंभरे यानी यशस्वीतेकरीता प्रयत्न केले.

पूढे बाजू मांडताना मार्गदर्शक बोलले की ङ्ग न्यायप्रिय महात्मा राजा रावण अत्यंत समृद्ध संस्कृतीच्या वैभवशाली वारसाचा दैदिप्यमान अविस्मरणीय ठेवा आहे व विविध गुणांचा समुच्चय आहे. राजा रावण महान दार्शनिक, संगीत तज्ज्ञ, राजनीतिक, शिल्पकार, आयुर्वेदाचार्य, विवेकवादी, उत्कृष्ट नगररचनाकार, समताधिष्ठित, समाजव्यवस्थेच्या उदगाता, साहित्यिक, न्यायप्रिय राजा अशा अनेक गुणांचा आविष्कार करणारा महानतम राजा होता. हजारो वर्षापासून मूलनिवासी आदिवासी त्याची पूजा करतात, त्याला आपला महानायक, शूरवीर योद्धा, महाज्ञानी, बलाढ्य शक्तीशाली विद्वान, अनेक शास्त्रांचा अभ्यासक व शंभुचा पुजारी मानतात. आजही रावण पूजा मेघनाथ पूजा करतात. तामिळनाडूमध्ये रावणाची ३५२ मंदिरे आहेत. सर्वात मोठी मूर्ती मध्यप्रदेशात मंदसौर येथे अंदाजे १५ मीटर उंचीची आहे छत्तीसगढ, मध्यप्रदेश, झारखंड आणि महाराष्ट्रातही अमरावती जिल्ह्यात मेळघाटसह सर्वत्र राज्यभर राजा रावणाची पूजा केली जाते.अशा या महान राजाला इथल्या षड्यंत्रकारी वर्णांध व्यवस्थेने बदनाम करण्यात कोणतीही कसूर ठेवली नाही. खलनायक म्हणून प्रसिद्ध केले आहे. परंतु सत्य लपून राहत नाही ते कधी ना कधी उघड होतेच. आदिवासी समाजातील व इतरही समाजातील संशोधक साहित्यिक यांनी रावणाचा खरा इतिहास शोधून काढला व जगासमोर मांडला आहे. रावण हे आदिम संस्कृतीचे श्रद्धास्थान व दैवत आहे.

# कुपोषित बालकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दया - जिल्हाधिकारी नयना गुंडे



**गोंदिया :** सुदृढ बालके हीच खरी देशाची संपत्ती आहे. त्यामुळे जिल्ह्यातील कुपोषित बालकांकडे आरोग्य विभागाने विशेष लक्ष देवून कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात नुकतीच आरोग्य विभागाच्या विविध योजनांची आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी मार्गदर्शन करतांना जिल्हाधिकारी नयना गुंडे बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अनिल पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अमरीश मोहबे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन कापसे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्रीमती गुंडे पुढे म्हणाल्या, जिल्ह्यात नियमीत लसीकरण सत्रामध्ये शंभर टक्के नोंदणी केलेल्या बालकांचे नियमीत लसीकरण करण्यात यावे, जेणेकरुन कुपोषणाचे प्रमाण कमी करता येईल. खाजगी रुग्णालयात ५० रुग्णांच्या वर रुग्ण असतात, त्यामुळे खाजगी रुग्णालयामध्ये झडअ झश्रपीं तयार करण्यात यावे. जिल्ह्यातील सर्व दवाखान्यातील त्र्ळीश ऑीवळीं करुन घ्यावे. शाळेतील १० ते १८ वयोगटातील मुलांची ळेींळव ढशीींळपस करुन घ्यावी. कोविड लसचा दुसरा डोस घेणा?यांची संख्या कमी असल्यामुळे दुसरा डोस घेण्यासाठी नागरिकांना प्रवृत्त करावे. तसेच सालेकसा व आमगाव तालुक्यातील तालुका आरोग्य अधिका?यांनी आरोग्याच्या बाबतीत जाणिवपूर्वक विशेष लक्ष दयावे असे त्यांनी यावेळी सांगितले.

श्री अनिल पाटील म्हणाले, बालकांना पोषण आहार व आरोग्याच्या योग्य त्या सुविधा देऊन जिल्ह्यातील कुपोषित बालकांची नियमीत काळजी घ्यावी. त्यांना आवश्यक तो आरोग्यविषयक सल्ला दयावा आणि जिल्ह्यातील बालकांचे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी सतत प्रयत्न करावे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, जननी सुरक्षा योजना, राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण, कुष्ठरुग्ण, राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, एनसीडी प्रोग्राम आयटी सॉफ्टवेअर, रुग्ण कल्याण समिती, सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रम, आशा स्वयंसेविका, गुणवत्ता ?शुरन्स कार्यक्रम, आयपीएचएस फिजीकल प्रोग्राम इन्स्टीट्यूशन, कुटूंब नियोजन कार्यक्रम, सीपीएचसी कल्सल्टंट, आरबीएसके स्कूल हेल्थ चेकअप, आयुष, आयडीडब्ल्यू वर्क इनफॉरमेशन, साथरोग नियंत्रण कार्यक्रम, रॅबिज नियंत्रण कार्यक्रम आदी विषयांचा या बैठकीत आढावा घेण्यात आला.

सभेला माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.अनंत चांदेकर, आरोग्य विभागीय नोडल अधिकारी डॉ.साजिद शेख, सहाय्यक जिल्हा माहिती अधिकारी के.के.गजभिये, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, सर्व कार्यक्रम समन्वयक व पर्यवेक्षक उपस्थित होते.

## कृषी व संलग्न महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून सुरु करण्यास मान्यता -कृषीमंत्री भुसे

**मुंबई :-** राज्यातील सर्व कृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित शासकीय व खाजगी विनाअनुदानित विद्यालये व महाविद्यालयातील नियमित वर्ग २० ऑक्टोबर, २०२१ पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात येत असल्याची माहिती राज्याचे कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी दिली. राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील इयत्ता १२ वी पर्यंतचे वर्ग दि. ४ ऑक्टोबर, २०२१ पासून सुरु करण्यात आलेले आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थी हे १८ वर्षावरील असून बहुतेक विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण झाले आहे. याचबरोबर राज्यातील कोविड-१९ बाधित रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झालेली असून सद्यस्थितीत ही साथ नियंत्रणात आल्याचे दिसून येत आहे. या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. १३ ऑक्टोबर २०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयामधील नियमित वर्ग दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ पासून सुरु करण्यास मान्यता दिली आहे. यास अनुसरुन कृषी विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न विद्यालये आणि महाविद्यालये सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# जंगल शेजारी शेतकऱ्यांची दफडी बनते मैत्रीण

**पवनी /धाबे** – पहाटेच्या प्रहरी रस्त्याने आम्ही फिरत असताना दोन व्यक्ती आम्हाला विरुद्ध दिशेने येताना दिसले. एकाच्या खांद्यावर दफडी वाद्य लटकाविले होते. आम्हाला वाटलं की कुठल्या कार्यक्रमात ही मंडळी वाद्य घेऊन जात असेल किंवा कार्यक्रम उरकून येत असेल परंतु आमचा अंदाज सपशेल खोटा ठरला.त्यांना विचारणा केल्यावर आश्चर्य वाटलं आणि म्हणून त्यांचा लगेच आम्ही फोटो घेतला. ही मंडळी आपल्या शेतातील पिकांचे वन्य प्राण्यांनपासून संरक्षण करण्यासाठी या दफडी वाद्याचा उपयोग करतात. कारण जंगल शेजारी शेतकऱ्यांची हे दफडी वाद्य मैत्रीण झाले आहे.



वन्यप्राण्यांनी शेतक-यांच्या पीकाची नासाडी केल्यावर शासन



जरी नुकसान भरपाई देत असेल तरी स्वयंप्रकाशित होण्याच्या अनुषंगाने शेतकरी रात्रभर आपल्या शेतात जागून पिकाचे संरक्षण करतात.जंगलाच्या शेजारी असणारे गांव आणि त्या गावक-यांच्या शेतजमीनीला हे वन्यप्राणी मोठं नुकसान करतात.

अर्जुनी /मोर तालुक्यातील पवनी /धाबे हे गांव नवेगावबांध जलाशय, तसेच नवेगावबांध नागझिरा व्याघ्र प्रकल्प याच्या कुशीत वसले असून या बरोबरच जांभळी, येलोडी, रामपुरी, येरंडी दर्रे, भसबोळन, झाशीनगर, कान्होली, कोहलगाव अशी अनेक गावे वसलेली आहेत.

येथील शेतकऱ्यांना वन्य प्राण्यांनपासून बचाव करण्यासाठी शेताच्या बांधावर भलंमोठं मचान बांधले जाते. तेथे दोघी मंडळी बसून काठ्या आणि कुऱ्हाड घेऊन रात्रभर शेत राखण करतात.मचानाच्या खाली रात्रभर विस्तव जळत असतो. रानडुकरे, अश्वल, बिबट्या,बंदर (वानर ) शेतात, आले की शेतकरी जोराजोराने हे वाद्य बडवितात त्यामुळे हे वन्यजीव घाबरून जाऊन पोबारा करतात. शेतकरी याबरोबरच आपल्या शेतात बॅटरी करेंट (यामुळं आवाज होतो, प्राण्याला हानी पोचत नाही ),रंगीत साड्यांचे कुंपण,टीन पिंप, आवाज करणारी नकली बंदूक इत्यादीचा वापर शेतकऱ्यांना करावा लागतो. वानर आणि रानडुकरे शेतकऱ्याचे अतोनात नुकसान करतात, हे विशेष.

अश्या प्रकारे जंगल शेजारी शेतकऱ्यांना आपलं जीव मुठीत घेऊन पिकांचे संरक्षण करावं लागतं.महिला शेतकरी पण यासाठी सहकार्य करतात.

वन्यप्राण्यांवर येथील शेतकरी तितकाच प्रेम ही करतो. हेही विशेष.

**पृथ्वीराज कोल्हटकर**

# आपत्ती व्यवस्थापनामधील मिशन चांदनी...

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव तालुक्यातील जवरी/गोरठा या गावाजवळ पुजारीटोला येथून वाहणाऱ्या मुख्य कालव्यात कुमारी चांदनी पाथोडे वय ११ वर्ष, निवासी गोरठा, ही मुलगी दिनांक १५ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी दहा वाजेदरम्यान म्हशी चरायला गेली असता कालव्यात पडून वाहून गेली होती.

सदर मुलीचा शोध घेण्यासाठी तात्काळ तालुकास्तरीय चमु व स्थानिक ढिवर समाजातील लोकांची मदत घेऊन दयाराम भोयर, तहसीलदार आमगांव यांनी शोध मोहीम राबवली. परंतु सायंकाळपर्यंत कोणतेही यश मिळाले नव्हते. दुसरीकडे दसऱ्याच्या निमित्ताने दुर्गा मातेच्या प्रतिमेच्या विसर्जनाकरिता जिल्हा शोध व बचाव पथकाला रजेगाव येथील कोरणी घाटात तैनात करण्यात आले होते. विसर्जनही महत्त्वाचे होते कारण, या ठिकाणी कोणतीही अप्रिय घटना घडायला नको, याचेही नियोजन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात येत होते.

आमगाव तालुक्यातील घटनेच्या दुसऱ्या दिवशी दिनांक १६ ऑक्टोबर २०२१ रोजी शोध कामासाठी जिल्हास्तरीय पथक रवाना करण्यात आले. घटनास्थळापासून २ किलोमीटर पर्यंत पुढे बेपत्ता चांदनीचा शोध लावण्यात आला परंतु तेवढ्यातही यश मिळाले नाही. कालव्याच्या माध्यमातून पुढे शोध घेताना अचानक "सायफन" आढळला. सायफन हा कुठलाही प्राणी किंवा जनावर नाही, हा एक भुयारी मार्ग आहे. सायफन ही इंग्रज कालीन व्यवस्था आहे. यामध्ये पाण्याच्या निकासीसाठी कालव्याच्या मधात किंवा सामोर येणारे नदी-नाले किंवा रस्ते यांना बाधित न करता त्यांच्या खालून व्ही आकार मध्ये ( फ्मम/ या आकारामध्ये) नदी-नाले यांच्या खालून पाण्याचा रस्ता तयार केला जातो




यालाच सायफन म्हंटल्या जातो. दरम्यान या भागाची शहानिशा केल्यानंतर याच ठिकाणी चांदनी याचा मृतदेह अडकला असेल असा प्राथमिक अंदाज आला. कालव्याचा प्रवाह सुरू होता, त्यामुळे पुजारीटोला येथून कालव्यात विसर्गाचे पाणी बंद करण्यात आले. जवळपास २४ तासानंतर पाणी कमी झाले व शोध कामाला गती मिळाली. परंतु तोपर्यत सायंकाळ झाली होती आणि दुसऱ्या दिवशीचे शोधकार्य थांबविण्यात आले.

परत तिसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक १७ ऑक्टोबर २०२१ रोजी जिल्हास्तरीय शोध व बचाव पथक सकाळपासून शोध कामात व्यस्त झाले. आज सायफनच्या पुढे शोध घेण्यात आला, तरीही बेपत्ता चांदनी सापडली नाही. शोध चमूचे सदस्य परत आले व घटनास्थळापर्यंत पुन्हा गेले, तरीही काहीच प्रगती झाली नाही. शेवटी पुन्हा सायफन कडे आम्ही आलो. एवढ्यातच तिसरा दिवसही संपला. तीन दिवस लोटूनही चांदनी बेपत्ता होती. दुसरीकडे या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये व्याप वाढत होता. शेवटी प्रशासनावर त्याचा ताण येऊ लागला. या घटनेवर जिल्हाधिकारी नयना गुंडे मॅडम यांची नजर असून राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांना बोलविण्याची तयारी झाली. कारण सायफन हा कालव्याचा भुयारी मार्ग होता आणि तो मार्ग पाण्याने पूर्णपणे बाधित होता. भुयारी सायफनमध्ये ऑक्सिजनची कमतरता होती तसेच लोखंडी अँगल पण होते. त्यामुळे रेस्क्यू करणाऱ्या लोकांना जिवाचा मोठा धोका होता.

राज्य आपत्ती प्रतिसाद दल नागपूर यांना बोलविण्यासाठी जिल्हाधिकारी महोदयांनी परवानगी दिली व लगेच मंत्रालयाकडून पाठपुरावा करण्यात आला. शेवटी घटनेच्या चौथ्या दिवशी दिनांक १८ ऑक्टोबर २०२१ रोजी आमगाव तालुक्यातील जवरी/गोरठा येथे डऊठऋची चमू पोहोचली. मनात आत्मविश्वास होता की नक्कीच आता बेपत्ता चांदनी सापडेल. मी घटनास्थळावर पोहोचलो, SDRF च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली परंतु सायफन ची भौगोलिक परिस्थिती पाहता SDRF च्या रेस्क्यूअर्स यांना जीवाचा धोका असल्याचे त्यांच्या वरिष्ठांकडून सांगण्यात आले, हे खरं होतं कारण तीन दिवसाच्या शोध कामात आम्हाला हा अनुभव आला होता.

आता काय.......... चौथा दिवस अजूनही मुलगी बेपत्ता..... भुयार कालव्यात सर्च ऑपरेशन म्हणजे जीव गमावण्या सारखेच. गावकरी व राजकीय लोकांचा प्रेशर...... परिस्थितीवर नजर ठेवून जिल्हाधिकारी यांनी पोलीस अधीक्षक विश्वा पानसरे,अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे यांच्यासोबत महत्वाची बैठक करून शेवटी पूर्ण कॅनल रिकामी करण्याचा निर्णय घेतला. मिशन थोडेशे अवघड वाटत होते, परंतु वरिष्ठांनी फ्री हॅन्ड दिले व घटनास्थळी काय निर्णय घ्यायचं ती स्वतंत्रता दिल्यामुळे आत्मविश्वास वाढला होता.

कालव्याच्या दोन्ही भागात मातीचे बंधारे बांधून पाणी अडवण्याचे नियोजन झाले. यानंतर सायफनच्या दोन्ही बाजूला १० ते १५ मोटर पंप लावून कालव्याच्या पाण्याचा उपसा करून भुयारी कालवा रिकामा करण्यात आला. यासाठी जवळपास पाच ते सहा तास लागले. सायफन काही प्रमाणात रीकामा झाल्यानंतर SDRF नागपूर व जिल्हा शोध व बचाव पथकाच्या सदस्यांनी रेस्क्यू करून चांदनीचा मृतदेह शोधून काढला. परंतु ङ्गसायफनङ्ग हा रेस्क्यू ऑपरेशन सर्वात कठीण आणि धोकादायक होता असे, पोलीस निरीक्षक बादल बिस्वास, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर यांनी आपल्या अनुभवातून सांगितले.

या घटनेत गावकरीच सर्वात जास्त संतापले होते परंतु ऐनवेळी प्रशासनाची मदतही त्यांनीच केली, कालव्यात मातीचा बंधारा असो किंवा पाणी उपसा करण्यासाठी मोटरपंप असो या सर्व बाबी त्यांच्यामुळेच शक्य झाली. दुसरीकडे गावकऱ्यांचे रस्ता रोको आंदोलनाला पोलीस आणि महसूल प्रशासन यांनी शांत केले. कानून व्यवस्था कडक ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी व ठाणेदार यांनी मेहनत घेतली.

कालव्याचे पाणी रोखून सायफन रिकामी करण्यासाठी सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता व त्यांच्या चमूने प्रयत्न केले. विद्युत विभागानेही या रेस्क्यू ऑपरेशनमध्ये महत्वाची भूमिका बजावली. महसूल प्रशासनाकडून जिल्हास्तरावरून वरिष्ठ अधिकारी आणि तहसीलदार आमगाव यांनी विशेष जबाबदारी पार पाडली. शेवटी मिशन चांदनी हे टीमवर्क च्या माध्यमातून साध्य झाले. जिल्हाधिकारी नयना गुंडे यांच्या मार्गदर्शनात तसेच पोलीस अधीक्षक विश्वा पानसरे यांच्या नेतृत्वात सदर कामगिरी करण्यात आली.

**राजन चौबे**
**आपत्ती व्यवस्थापन अधिकारी**

### जिल्हास्तरीय पथक

तहसीलदार आमगांव दयाराम भोयर, सहा.पो.नि.नाले, शोध बचाव पथकाचे सदस्य नरेश उके, राजकुमार खोटेले, राजकुमार बोपचे, जसवंत रहांगडाले, रवि भांडारकर, संदीप कराडे, दिनू दिप, राज अंबादे, सुरेश पटले, चालक- मंगेश डोये, इंद्रकुमार बिसेन चुंन्नीलाल मुटकुरे, जबराम चीफ चिखलोंडे, गिरधारी पतैह, चिंतामण गिरहेपुंजे यांनी शोध काम केले.

# केंद्र शासनाच्या योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवा- खा.अशोक नेते

**गोंदिया :** सर्वसामान्य जनतेचा विकास होण्याच्या दृष्टीने केंद्र शासन विविध योजना राबवित असते. त्या योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या विभागांनी आपसात समन्वय ठेवून योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवावा. असे निर्देश गडचिरोली-चिमूर क्षेत्राचे खासदार अशोक नेते यांनी दिले. १८ ऑक्टोंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) सभेत अध्यक्षस्थानावरुन मार्गदर्शन करतांना खासदार नेते बोलत होते.

यावेळी गोंदिया-भंडारा लोकसभा क्षेत्राचे खासदार सुनिल मेंढे, आमदार सर्वश्री विनोद अग्रवाल, मनोहर चंद्रिकापुरे,विजय रहांगडाले, जिल्हाधिकारी नयना गुंडे, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील व पोलीस अधिक्षक विश्व पानसरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. खासदार अशोक नेते पुढे म्हणाले, केंद्राच्या ग्रामीण व शहरी भागासाठी अनेक योजना आहेत.

मात्र त्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही असे दिसून येत आहे. त्यामुळे अंमलबजावणी यंत्रणांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून कामे करावीत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना पंतप्रधान पीक विमा योजनेचा लाभ मिळाला पाहिजे, त्यासाठी कृषि विभागाने गावपातळीवर या योजनेची माहिती शेतकऱ्यांना दयावी. जंगली प्राण्यांपासून शेतपिकांचे नुकसान झाल्यास वन विभागाने शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला देण्यात यावा. नैसर्गीक आपत्तीत सापडलेल्या व्यक्तींना वेळीच मदत करावी. गरीब व गरजू व्यक्तींना यादृष्टीने लाभ देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने लक्ष दयावे असे त्यांनी सांगितले. प्रधानमंत्री मुद्रा बँक योजना ही बेरोजगार व्यक्तींना स्वावलंबी बनविण्यासाठी अत्यंत उपयुक्त योजना आहे. बँकांनी या योजनेतून शिशू, किशोर व तरुण या तीन गटातून कर्ज देतांना बेरोजगारांची दिशाभूल करु नये.जिल्हाधिकारी व जिल्हा अग्रणी प्रबंधक यांनी मुद्रा योजनेत व्यक्तीश: लक्ष घालून सर्व बँकेच्या अधिकाऱ्यांना नोटीस दयावे व बेरोजगारांच्या तक्रारींचे निराकरण करावे असे सांगितले. रेल्वे विभागाने देवरी ते आमगाव ६ कि.मी.चा रस्ता तयार करण्यासाठी बोरकन्हार व वडेगाव ग्रामपंचायतचा ठराव घेऊन शासनाकडे प्रस्ताव सादर करावा. बहुतेक गावातील स्ट्रीट लाईट बंद आहेत. त्यामुळे विद्युत विभागानेसामाजिक बांधिलकी ठेवून गावातील स्ट्रीट लाईनचे कनेक्शन कापू नये. सगळ्या ग्रामपंचायतींनी स्ट्रीट लाईटचे पैसे न भरण्याचा ठराव घेऊन जिल्हाधिकाऱ्या मार्फत प्रस्ताव शासनाकडे पाठवावा असे सांगितले. जिल्ह्यात गोडावूनची कमतरता भासत




आहे. त्यामुळे संबंधीत विभागांनी गोडावून तयार करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. धान खरेदीबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी ऑडिट करावे. ई-पीक पाहणी तलाठ्यांमार्फत करण्यात यावे. अंमलबजावणी यंत्रणांनी कामात हयगय करु नये. ज्या कामांची जबाबदारी संबंधीत यंत्रणांना दिलेली आहे ती कामे तत्परतेने करावीत असे खासदार नेते यांनी यावेळी सांगितले. खासदार मेंढे म्हणाले, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या यादीमध्ये घोळ झालेला आहे. पात्र लाभार्थी अपात्र ठरलेले आहेत. त्यामुळे जिल्हाधिका?्यांनी याकडे विशेष लक्ष दयावे. कृषि विभागाने पिकांच्या नुकसानीची माहिती घेऊन शेतक?्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी त्वरित शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. नाबार्डच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात शेतकऱ्यांची कार्यशाळा घेण्यात यावी. जिल्ह्यातील प्रत्येक पेट्रोलपंपावर प्रधानमंत्री उज्वला योजनेबाबत बॅनर्स लावण्यात यावे. पंतप्रधान गॅरंटी रोजगार योजनेमध्ये २५ लाखापर्यंत लोन देता येते. या योजनेमध्ये २५ टक्के सबसीडी आहे असे त्यांनी यावेळी सांगितले.

आमदार विनोद अग्रवाल म्हणाले, विमानतळ प्राधिकरणाने बिरसी विमानतळ जवळ असलेल्या ५० घरांचे अतिक्रमण काढलेले आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्त नागरिकांची पर्यायी व्यवस्था करुन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाकडे त्वरित प्रस्ताव पाठवावा. पीक विम्याचे पैसे अजूनपर्यंत शेतक-यांना मिळालेले नसल्यामुळे कृषि विभागाने याकडे विशेष लक्ष दयावे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना १८ हजार रुपये मिळालेले नाहीत, त्यामुळेसंबंधीत विभागाने याकडे लक्ष दयावे.

बेरोजगारांना मुद्रा योजनेचा लाभ देण्यासाठी बँकेचे अधिकारी टाळाटाळ करतात. बेरोजगार युवकांना रोजगार मिळावा यासाठी मुद्रा योजनेअंतर्गत बँकेने कर्ज दिले पाहिजे. शेतकऱ्यांना गोठा बांधण्याची गरज आहे. त्यासाठी वैयक्तिक लाभाच्या योजनेअंतर्गत गोठे बांधकाम करण्यात यावे, असे त्यांनी सांगितले.


आमदार मनोहर चंद्रिकापुरे म्हणाले, जिल्ह्यात शेतपिकावर खोडकिडा व तुडतुड्यांचा प्रादुर्भाव वाढलेला आहे.त्यामुळे कृषि विभागाने वेळीच उपाययोजना करावी. मागेल त्याला घरकूल देऊ असे पंतप्रधानांचे स्वप्न आहे. त्यामुळे गरजू लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात यावा असे त्यांनी सांगितले.

आमदार विजय रहांगडाले म्हणाले, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत ५ वर्षापर्यंत रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या प्रपत्र-ड यादीमध्ये मोठ्या प्रमाणात घोळ झालेला आहे.त्यामुळे याबाबत जो कोणी दोषी असेल त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, असे त्यांनी सांगितले. यावेळी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना, दिनदयाल अंत्योदय योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, दिनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण/शहरी), स्वच्छ भारत मिशन (शहरी/ग्रामीण), राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण, दिनदयाल उपाध्याय ग्रामीण ज्योती योजना, शामाप्रसाद मुखर्जी रुरबन मिशन, राष्ट्रीय वारसा शहरी विकास आणि संवर्धन योजना, अटल नविनीकरण शहर परिवर्तन योजना, स्मार्ट शहर अभियान उज्वल डिस्कॉम एंश्योरेन्स योजना, प्रधानमंत्री फसल विमा योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान, सर्व शिक्षा अभियान, एकात्मिक बाल विकास योजना, शालेय पोषण आहार, प्रधानमंत्री उज्वला योजना, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, पाणी पुरवठा व स्वच्छता, पंचायत राज, आदिवासी विकास व ग्रामीण विद्युतीकरण, सार्वजनिक बांधकाम,डाक, बीएसए-नएल, वन, मुद्रा योजना, नाबार्ड, बँक ऑफ इंडिया आदी योजनांबाबत आढावा घेण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे अतिरिक्त प्रकल्प संचालक डी.बी.हरिणखेडे यांनी केले. सभेला माजी आमदार संजय पुराम, अप्पर जिल्हाधिकारी राजेश खवले, उपवनसंरक्षक कुलराज सिंग, निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) स्मिता बेलपत्रे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) सुभाष चौधरी, जिल्हा नियोजन अधिकारी कावेरी नाखले, यांचेसह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# कोका परिसरात आढळला बिबट्याचा मृतदेह

**पालोरा –** कोका वन्यजीव अभयारण्याला लागून असलेल्या गावाबाहेरील एका बोडीत रविवारी सहा वर्षीय नर बिबट्याचा मृतदेह आढळून आल्याने वनविभागात खळबळ उडाली आहे. वनकर्मचारी व पशूवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बिबट्याचा शवविच्छेन करून येथील विश्रामगृह परिसरात दाहसंस्कार करण्यात आला.



**विद्युत प्रवाहाने मृत्यू झाल्याचा अंदाज**

भंडारा वनपरिक्षेत्रातील कोका येथील खाजगी गट क्रमांक ४९९ भुताई बोडी याठिकाणी बिबट्या वन्यप्राणी मृतावस्थेत असल्याची माहिती कोका गावात पसरली. ग्रामस्थांची गर्दी बोडीच्या दिशेने जात असल्याचे वनाधिकाऱ्यांना कळताच त्यांनी घटनास्थळ गाठले. उपवनसंरक्षक एस.बी. भलावी, सहाय्यक वनसंरक्षक वाय.बी. नागूलवार व वनपरिक्षेत्र अधिकारी भंडारा व्ही.बी. राजूरकर घटनास्थळी पोहोचले असता त्यांना अंदाजे पाच ते सहा वर्ष वयोगटातील नर बिबट मृतावस्थेत आढळला. यावेळी तपासाकरिता साकोली वन्यजीव कार्यालयातून श्वान पथक बोलाविण्यात आले. दरम्यान मृत बिबट्याला कोका येथील वनविश्रामगृहात हलविण्यात आले. येथे राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरण यांच्यामार्फत मार्गदर्शक सूचनांप्रमाणे सदर बिबट्याचे शवविच्छेदन लाखनीचे पशूधन विकास अधिकारी गुणवंत भडके व मानेगावचे पशूधन विकास अधिकारी विठ्ठल हटवार यांनी केले. यावेळी मानद वन्यजीव रक्षक भंडारा शाहिद खान व राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरणानेचे प्रतिनिधी म्हणून सहाय्यक वनसंरक्षक साकेत शेंडे उपस्थित होते. पुढील तपास उपवनसंरक्षक एस.बी. भलावी यांचे मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

**विद्युत प्रवाहाने मृत्यू झाल्याचा अंदाज – डॉ. भडके**

मृत बिबट हा नर जातीचा असून ५ ते ६ वर्षाचा आहे. शिकारीच्या शोधात बिबट असतांना रविवार १७ रोजी सकाळी ७.३० वाजताचे दरम्यान या बिबट्याचा विद्युत प्रवाहाने मृत्यू झाला असावा, मृत बिबट्याच्या छाती व अन्य भागास विद्युत प्रवाहामुळे इजा झाल्याचे दिसून आले. त्यामुळे एखाद्या शेतशिवारात बिबट्याचा मृत्यू होऊन त्याचा मृतदेह बोडीत आणून फेकला असावा, असा अंदाज पशुधन विकास अधिकारी डॉ. गणवंत भडके यांनी व्यक्त केला.

# आंबेडकर व बुद्धांचे विचार आत्मसात करा- आ.मनोहर चंद्रिकापुरे

**अर्जुनी-मोरगाव :** तालुक्यातील खांबी-पिंपळगाव येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी अर्जुनी-मोरगाव क्षेत्रातील आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांच्या हस्ते ध्वजारोहन व डॉ.बाबासाहेब आंबेडकर, तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी आंबेडकर व बुद्धांचे विचार आत्मसात करा, असा सल्ला आ.चंद्रिकापुरे यांनी तरुणांना दिला.

याप्रसंगी प्रामुख्याने सामजिक कार्यकर्ते प्रमोद डोंगरे, बंडूभाऊ भेंडारकर, गावातील सरपंच प्रकाश शिवनकर, तंमुस अध्यक्ष भगवान मेंढे, पोलीस पाटील नेमिचंद मेंढे, उपसरपंच देवानंद रामटेके, संजय ठवरे, भायदास डोंगरे, विकास डुंबरे उपस्थित होते.

नागरिकांना आ.चंद्रिकापुरे यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले, जीवन पूर्णपणे जगायचे असेल तर सर्वांनी गतिमान जीवन जगण्याचे सामर्थ्य ठेवणे आव्यश्यक आहे. समाजाचे उद्धार, स्वत:चे उद्धार करायचे असेल व कीर्तिमान बनायचे असेल तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर व बुद्धांचे विचार आत्मसात करा. असा सल्ला त्यांनी तरुणांना दिला. दरम्यान गावात बससेवा सुरु करणे, गावातील काही असलेले उर्वरित कार्य पूर्णत्वास आणण्याचा प्रयत्न नक्की करेन, असे आश्वासन सुद्धा त्यांनी दिले. संचालन शैलेंद्र बोरकर यांनी केले. आभार जितेंद्र बोरकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी गावातील सर्व समाजबांधव व महिलांनी सहकार्य केले.



# धान विक्री नोंदणीला पुन्हा मुदतवाढ

**गोंदिया-** पणन हंगाम २०२१-२२ मध्ये विकेंद्रीत धान व भरडधान्य योजनेअंतर्गत धान व भरडधान्य खरेदी पोर्टलवर शेतकऱ्यांची नोंदणी मुदत पहिल्यांदा ३० सप्टेंबर होती. यानंतर १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. ई-पिक पाहणी ॲपवर नोंदणीसह सातबारा व नमुना आठ मिळण्यास दिरंगाई होत असल्याने अनेक शेतकरी आधारभुत धान खरेदी केंद्रावर धान विक्री करण्यापासून वंचित राहण्याची शक्यता होती. त्यामुळे धान खरेदी नोंदणीला ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

यासंबंधीचा शासन निर्णय १४ ऑक्टोबर रोजी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे सहसचिव सुधीर तुंगार यांनी जारी केला आहे.

धान उत्पादक शेतकऱ्यांची एनईएमएल पोर्टलवर नोंदणी करण्याकरिता कळविण्यात आलेले होते. परंतु, शेतकऱ्यांची पीकपेरा अद्यावत न झाल्याने शेतकरी नोंदणीकरिता ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधी, खरेदी संस्थांसह शेतकऱ्यांकडून सुरू होती. अखेर या मागणीची दखल घेण्यात आली. सदर योजनेपासून शेतकरी वंचित राहू नये याकरिता सर्व धान खरेदी संस्थांनी शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत आपल्या धान खरेदी केंद्राच्या कार्यक्षेत्रात असलेले कोणतेही शेतकरी ऑनलाईन नोंदणीअभावी धान विक्री करण्यापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे जिल्हा पणन अधिकाऱ्यांनी अजय बिसने यांनी खरेदी संस्थाना कळविले आहे.

**८४ हजार शेतकऱ्यांची धान विक्रीसाठी नोंदणी**

जिल्ह्यात जिल्हा पणन कार्यालय आणि आदिवासी विकास महामंडळ नाशिक अंतर्गत संचालित उपअभिकर्ता संस्थांच्या माध्यमातून धान खरेदी करण्यात येते. जिल्हा पणन कार्यालयांतर्गत १०७ केंद्रांवर आतापर्यंत ८४ हजार १४ शेतकऱ्यांनी धान विक्री करिता नोंदणी केली आहे. गतवर्षी पणन कार्यालयाअंतर्गत केंद्रावर १ लाख २७ हजार शेतकऱ्यांनी धान विक्रीसाठी नोंदणी केली होती. नोंदणीला मुदतवाढ देण्यात आली नसती तर हजारो शेतकऱ्यांना धान विक्री पासून वंचित राहावे लागले असते. परिणामी त्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले असते. शासनाच्या निर्णयाने धान उत्पादक शेतकर्‍यांना दिलासा मिळाला आहे.

**महात्मा रावण महोत्सव साजरा**

**अर्जूनी/मोर-** बिरसा क्रांति दलाच्या व जय सेवा गोटूल समिती प्रतापगढ च्या वतीने महात्मा रावण महोत्सव साजरा करण्यात आला. इंजी.यंशवंतजी गणविर यांच्या अध्यक्षतेखाली भोजराम लोगडे सरपंच प्रतापगढ यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यांत आले.कार्यक्रमाला प्रमुख पाहुने म्हणुन अनिल दहिवल, योगेश जनबंधु पो. पाटील,तेजराम राऊत ,ताराचंद उईके,उमेश मडावी उपसरपंच,रामेश्वर शेंडे,दिनेश मडावी,शेषराव सलामे,सुखदेव कनोजे,सौ हर्षाताई राऊत ग्रा.प.सदस्या तसेच गावातील गणमान्य व्यक्ति महिला उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी तुलशिदास कोडापे, जयपाल तुलावी,विजय मडावी, ,मुकेश मडावी, अजय नेताम,महेश कुंभरे,प्रमोद सलामे,मायावती सलामे,राजेंद्र ताराम, आकाश मडावी, देवेंद्र कोडापे तथा सर्व आदिवासी समाज बांधव प्रतापगढ यांनी सहकार्य केले.

# कोका अभयारण्यातून गांज्याची तस्करी;दोन आरोपींना अटक

**भंडारा –** जिल्ह्यातील कोका वन्यजीव अभयारण्यात गस्ती दरम्यान काही इसम मोटारसायकलने गांजाची तस्करी करताना आढळून आले. चौकशीअंती दोन तस्करांना पकडून लाखनी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले, तर एकजण पळून जाण्यात यशस्वी झाला.

कोका वन्यजीव अभयारण्यातील ए.एन. पवार हे १८ रोजी पहाटे ५.३० वाजताच्या सुमारास गांगलवाळा बिटमध्ये गस्तीसाठी जात असताना त्यांना काही संशयित व्यक्ती दुचाकीसह दिसून आले. त्यांची विचारपूस केली असता एकजण पळून गेला. त्यामुळे संशय बळविल्याने दोन्ही मोटारसायकल ताब्यात घेऊन इसमांची सखोल चौकशी करण्यात आली. यावेळी मोटारसायकल क्रमांक एमपी ३८/एम.जे. ०१०७ व सीजी ०४/एम ९७५४ ची तपासणी केली असता दुचाकींच्या डिक्कीमध्ये अंदाजे साडेतीन किलो गांजा लपविल्याचे दिसून आले. आरोपींना गराडा चौकीत आणून अधिक चौकशी केली असता त्यांनी आपले नाव महेश पन्नालाल शाहू रा. बावणवाडा व देवेंद्र जगन्नाथ कहार रा. खरगून (मध्यप्रदेश) येथील रहिवासी असल्याचे व फरार आरोपीचे नाव अखिलेश गंगाराम दुबे असल्याचे सांगितले. अखिलेश दुबे यांच्या सांगण्यावरून त्यांनी उडीसा राज्यातून गांजा खरेदी करून मध्यप्रदेशात नेत असल्याची कबूली दिली. यावरून सदर आरोपी गांजा तस्कर असल्याचे निष्पन झाल्याने त्यांना लाखनी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

# शेतकऱ्यांनी प्रॉडक्ट फार्मिंग कंपनीची निर्मिती करुन विकास करावा-खा.पटेल





**गोंदिया –** तालुक्यातील कोचेवाही येथे राष्ट्रवादी काँग्रेसचा मेळावा पक्षाचे राष्ट्रीय नेते खासदार प्रफुल पटेल यांच्या उपस्थितीत पार पडला.या मेळाव्यात काँग्रेसचे माजी जिला परिषद सदस्य तसेच गोंदिया पंचायत समितीच माजी उपसभापती ओमप्रकाश भक्तवती यांनी खासदार प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वावर व पक्षाच्या विचारधारेवर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश केला.यावेळी खासदार पटेलांनी पक्ष कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्या समस्या ऐकून सध्याच्या परिस्थितीवर मार्गदर्शन केले.

पुढे बोलतांना खासदार प्रफुल पटेल म्हणाले की, परिसरातील सुशिक्षीत शेतकऱ्यांनी शेतीची उन्नती, विविध पिकांचे उत्पादन नविन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने घेण्यासाठी एकत्र येवुन प्रॉडक्ट फार्मिंग कंपनीची निर्मिती करावी.काटी – डांगोली बँरेजच्या निर्मिती मुळे शेतीला पाण्याचा पुरवठा होऊन शेतीमध्ये शेतकरी विविध पिके घेऊन शेतकर्‍यांचा आर्थिक विकास होईल. यावेळी कर्यक्रमाला माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हाध्यक्ष विजय शिवणकर,राजलक्ष्मी तुरकर, केतन तुरकर, बालकृष्ण पटले, कुंदन कटारे, गणेश बर्डे, डॉ. विनोद पटले, चैतराम पटले, रंजीत बिसेन, सुरेश भकतवती,सुनील पटले, शैलेश वासनिक,जीतेन्द्र बिसेन, ओमप्रकाश भकतवती, संजय पटले, मोरेश्वर भकतवती, मधुकर ऊके, अनिल रिनायत,योगराज कुंभलकर, रोशन परिहार, शिवलाल जभरे, प्यारेलाल चौधरी, दुर्गाप्रसाद तुरकर, ओमप्रकाश ठाकरे, छोटुभाऊ जमरे, रमेश टेंभरे व नागरिक, कार्यकर्ता व अन्य उपस्थित होते.

या कार्यक्रमात खासदार प्रफुल पटेल यांच्या उपस्थितीत गोंदिया तालुक्यातील असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.सर्व प्रवेशितांचे श्री पटेल यांनी पक्षाचा दुपट्टा घालून स्वागत केले.यात सर्वश्री ग्राम चंगेरा : अदनान खान, सलीम दखनवार, उमेद मरकाम, नविन दखवार, अजीम खान, ग्राम कोचवाही : यारणबाई पटले, सुरेखाताई राउत, केशरबाई वहगारे, अनिशा बिसेन, मुनेश्वरी गौतम, पारवतीबाई नेवारे, नौसल नेवारे, ग्राम कोरनी : गेंदलाल पटले, सुरेंद्र तुरकर, गोविन्द न्यायकरे, रघुनाथ सहारे, रोहित भोयर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

**गुनेरीया,गजभिये यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रवेश**

**तिरोडा–** राज्यसभेचे खासदार मा प्रफुल्लभाई पटेल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून नगरसेवक राजेश गुनेरीया,राखी गुनेरीया,महाप्रज्ञा बुद्ध विहार समीतीचे अध्यक्ष अतुल गजभिये,भावना गजभिये, युवा कार्यकर्ते साजन रामटेके यांनी कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. खासदार प्रफुल्ल पटेल यांनी त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा दुपट्टा देऊन स्वागत केले. यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक अजयसिंह गौर, माजी जि. प. अध्यक्ष विजय शिवणकर, माजी जिल्हा परिषदेचे पक्षनेता गंगाधर परशुरामकर, माजी जि. प. सदस्य राजलक्ष्मी तुरकर,कैलास पटले, अभियंता प्रशांत दहाटे, नगरसेवक प्रभु असाटी, माजी नगरसेवक सलीम जवेरी प्रामुख्याने उपस्थित होते. माधोराव ठवकर, रमेश भोयर, ढोमने काकाजी, रवी घरडे, जयेंद्र कोटांगले, विजय गौरे, आरजु रामटेके, पुरण चौरे, नत्थु राणे, विकास दरवडे, सुदाम बांडेबुचे, मुंनेश्वर कारेमोरे, मंसाराम बांडेबुचे, राजकुमार खोब्रागडे, कश्यप भालेराव, सचिन राऊत, अशिकांत चौरे, मोहित कोटांगले, तन्मय रामटेके, अभिजित टेंभेकर, राकेश भास्कर यांनी सुद्धा पक्ष प्रवेश केला. त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

**काटी मरारटोला येथील कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश**

खासदार प्रफुल पटेल यांच्या काटी येथील कार्यक्रमात मरारटोलाचे कृष्णाकुमार माने, राजेश भातपिरे, संतोष पाचे, दीपक ठाकरे, किशोर माने, कल्पेश सहारे , दीपक पाचे , संतलाल पाचे, पारस डोंगरे, रणजित लांजेवार, चंद्रकांत चौधरी, नेतुल उके, वाघोली से सर्वश्री राजेश चौरे,दीनदयाल मालगाये , चैतराम खांडवाये, मिलिंद रामटेके, जीवन सोरले, रवींद्र डहाटे, सुरेश माने ,छगन बिसेन, दिनेश पाचे, शिव बाहे, मितलेश माने, नरेंद्र कावरे, विशाल मेश्राम, अरविंद डहाट सहित अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.




# रेशन लाभार्थ्यांची धान्य वितरण यादी ग्रापंमध्ये लावा

**गोंदिया –** रेशन लाभार्थ्यांकडून येणाऱ्या तक्रारीचे दखल घेत आ. विनोद अग्रवाल यांनी तहसील कार्यालयात बैठक लावून रेशन लाभार्थ्यांना धान्य वितरणाची याद्या ग्रामपंचायतीमध्ये लावण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. शहरी आणि ग्रामीण भागातील शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळत नाही, धान्य वितरणात गोंधळ आहे,



अधिक पैसे आकारले जातात, तसेच संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेचा लाभ मिळत नसल्याच्या तक्रारी आ. अग्रवाल यांना प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत तहसील कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला जिल्हा अन्न पुरवठा अधिकारी सवाई, तहसीलदार आदेश डफल, नायब तहसीलदार पालांदूरकर, नायब तहसीलदार पाटणे, अन्न निरिक्षक भारती वाकुडे, अन्न विभागाचे शिंदे आदी अधिकारी उपस्थित होते. यावेळी आ. अग्रवाल यांनी शासकीय योजनेंतर्गत लाभार्थ्यांना मिळणाऱ्या अन्नधान्याच्या वितरणाच्या तक्रारींवर नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, प्रत्येक गरीब आणि गरजू व्यक्तीला धान्य मिळावे, यासाठी सरकारची योजना राबविते. परंतु प्रसायकीय स्तरावर त्यांची योग्य अंमलबजावणी होत नसल्याने लाभार्थ्यांनी योजनांपासून वंचित राहतात.

लाभार्थ्यांना ठरविलेल्या दरात धान्य देऊन त्याची पावती दिली पाहिजे. जास्त पैसे घेणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. ज्या लोकांनी रेशन उचलले नाही त्यांची नावे कापण्याचे काम सुरू आहे जे चुकीचे आहे असेही ते म्हणाले. अशा लाभार्थ्यांची माहिती घ्यावी आणि त्यांना ६ महिन्यांचा कालावधी द्यावा. रेशन वितरणात सकारात्मकता आणण्यासाठी, आ. अग्रवाल यांनी सर्व ग्रामपंचायतींमध्ये अन्नधान्याचा लाभ घेणारे लाभार्थी आणि अन्नधान्याचा निश्चित कोटा ठेवावा. संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी निराधार योजना व श्रावण बाल योजनेच्या लाभार्थ्यांना आधार रक्कम न मिळाल्याच्या तक्रारी येत आहेत, नवीन लाभार्थ्यांना योजनेपासून वंचित ठेवण्याचेच काम केले जात आहे. नवीन लोकांच्या येणाऱ्या अर्जांवर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, त्यांना योजनेचा लाभ मिळाला पाहिजे, तसेच योजनेची विलंबित रक्कम त्वरित प्रदान करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी संबंधित अधिका-यांना दिल्या.

# रुचीएक्स बायोफ्युल्स प्रकल्प विदर्भासाठी रोलमॉडेल ठरेल -जिल्हाधिकारी डॉ.नयना गुंडे




**गोंदिया,:–** वाढत्या प्रदुर्षणावर आळा घालण्यासाठी जैवइंधनाची गरज काळाची झाली असून या प्रकल्पामुळे गोंदिया जिल्ह्या–चाच नव्हे तर विदर्भात नवी क्रांती घडून येणार आहे.या प्रकल्पाच्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्रात जिल्ह्यासाठी आजचा दिवस हा क्रांतीकारी पाऊल ठेवणारा ठरल्याचे विचार प्रकल्पाच्या पायाभरणी समारंभाला मार्गदर्शन करतांना जिल्हाधिकारी डॉ.नयना गुंडे यांनी व्यक्त केले.सोबतच रुचीएक्स बायोफ्युल्स कंपनीने घेतलेला या क्षेत्रातील पुढाकार जेवढा महत्वाचा आहे,तेवढाच कृषी क्षेत्रात जैविकतेला महत्व देत परिसरातील शेतकर्यांना नवा संदेश देणारे ठाकूर कुटुंबियांचे योगदना कृषी क्षेत्रासाठी महत्वाचे आहे.बायोफ्युल प्रकल्पाच्या पायाभरणीमुळे नवा प्रकल्प आपल्या जिल्ह्यात आला असून या प्रकल्पाच्या माध्यमातून आजच्या घडीला जरी जिल्ह्यात प्रदुषर्नाचा प्रभाव नसला तरी भविष्यातही तो होऊ नये हे थांबवण्यासाठी हा मदत होणार असून हा प्रकल्प विदर्भासाठी रोलमॉडेल ठरेल आणि जिल्ह्याच्या शेतकर्यांच्या विकासात नवीन दिशादर्शक ठरेल असे जिल्हाधिकारी गुंडे म्हणाल्या. त्या गोंदिया तालुक्यातील रायपूर येथे जैव इंधन व जैविक खतांचा निमि'ती प्रकल्पाचा पायाभरणी समारंभ विजयादशमीच्या पर्वावर(दि.१५) पार पडला,त्याप्रसंगी बोलत होत्या.

प्रकल्पाच्या पायाभरणी समारंभाला जिल्हाधिकारी डॉ.नयना गुंडे,जिल्हा परिषदेचे सीईओ अनिल पाटील,प्रजापित ब्रम्हकुमारी विद्यालय गोंदियाच्या संचालिका रत्नमालादिदी, कामठीच्या प्रेमलतादिदी,कृषी विभागाच्या उपअधिक्षक कु.प्रणाली चव्हाण,उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट,तहसिलदार अनिल खडतकर,तालुका कृषी अधिकारी डी.एल.तुमडाम,रुची बायो कंपनी लिमिटेडचे संस्थापक प्रेरणास्त्रोत श्रीरामजी ठाकुर,रायपूरचे सरपंच मनोज कोल्हे,बलमाटोलाचे सरपंच श्री पाचे,कृषी विज्ञान केंद्र बालाघाटचे डीन डॉ.एन.के.बिसेन,कृषी विज्ञान केंद्र बडगावचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ.राऊत,कृषी महाविद्यालय बालाघाटचे डॉ.उत्तम बिसेन,प्रभारी उपसंचालक कृषी राजेश खोब्रागडे,भालचंद्र ठाकूर,यांच्यासह गोंडवाना पॉवर प्रोडयुसर कंपनी लिमिटेडचे सर्व संचालक उपस्थित होते.

यावेळी गोंदिया तालुक्यात या प्रकल्पासाठी उत्कृष्ठ काम गावपातळीवर केलेल्या ग्रामप्रमुखांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या पायाभरणी कार्यक्रमात बोलतांना जिल्हा परिषदेचे सीईओ अनिल पाटील म्हणाले की,भारताचे शास्वत विकास व्हावे अशी इच्छा माजी राष्ट्रपती स्व.अब्दुल कलामांची होती.ती ईच्छा या जिल्ह्यात या प्रकल्पाच्या माध्यमातून पुर्ण होणार असून त्यांच्या जंयतीदिनी व जागतिक महिला दिनी या प्रकल्पाचा पायाभरणी होतेय हे विशेष आहे.गोंदिया जिल्ह्यात औद्योगिक विकास नसून शेतीवर आधारीत प्रकल्पातूनच काही प्रमाणात रोजगार उपलब्ध झालेला आहे.औद्योगिक विकास जिल्हा मागासला आहे,परंतु या प्रकल्पाच्या माध्यमातून नवी संधी रोजगाराची व व्यवसायाची उपलब्ध झालेली आहे.या प्रकल्पात विशेष करुन ज्या गवताचा वापर होणार आहे,त्याव्यतिरिक्त जनावर जो गवत व झाडांना खात नाही,परंतु तो कुजणारा असेल तर त्या गवताचा व झांडाचा वापर या प्रकल्पाच्या जैवइंधन निर्मितीसाठी वापरण्याची गरज असल्याचे पाटील म्हणाले. आपल्या जिल्ह्यातील कुठल्याही रस्त्याच्या कडेला हमखास तुळशीसारखा जो झाड बघावयास मिळतो तो कुठल्याच कामाचा नाही,त्या झाडाचा वापर कच्चा माल म्हणून करता येत असेल तर बघावे अशी सुचनाही त्यांनी यावेळी दिली.या प्रकल्पाच्या उत्पादीत गॅस व जैविक खताकरीता मार्केटिंगकडेही लक्ष द्यावे आमची जिल्हा परिषद यात सहकार्य करेल असेही ते म्हणाले.

यावेळी कृषी विभागाच्या उप अधिक्षक प्रणाली चव्हाण यांनी लॉंकडाऊनच्या काळातील वेळेच्या संधीचा वापर करुन सोनं केल्याचे म्हणाले.उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट यांनी जिल्ह्यातील शेतकरी बांधवानी धानाच्या चक्रव्यूहातून बाहेर पडून नकदी पिकाकडे पडण्याची गरज आहे.किर्लोस्करांनी जेव्हा सुरवात केली तेव्हा खुप विरोध होता,आज तेच किर्लोस्करांचे नाव ब्रॅंड ठरल्याची आठवण करुन देत तसेच नाव रुचीएक्स बायोफ्युल्स कंपनीचे होईल अशा विश्वास व्यक्त केला.

प्रास्तविकात संचालक महेंद्र ठाकूर यानी पेट्रोल– डिझेल आणि गॅस यांच्या किंमतीत सातत्याने वाढ होत आहे.तसेच पर्यावरणाच्या दृष्टीकोनातूनही हे पदार्थ हानीकारक आहेत. तेव्हा याला पर्याय म्हणून गोंदिया तालुक्यातील रायपूर येथे २५ एकर जागेवर जैव प्रक्रिया करून जैव इंधन व जैविक खतांचा निर्मिती प्रकल्पाचा पायाभरणी समारंभ विजयादशमीच्या पर्वावर(दि.१५) होत असून दोन दशकांपासून अग्रीकल्चर बायोटेक्नालॉजी क्षेत्रात काम करणारी रुचीएक्स बायोफ्युल्स प्रायवेट लिमिटेड मुंबईच्या नामवंत मिरा क्लिनफ्युल कंपनीच्या तांत्रिक व आर्थिक मदतीने हा प्रकल्प पुर्ण करणार असल्याचे सांगितले. संचालन गोंडवाना पॉवर प्रोडयुसर कंपनीचे संचालक इंजि.राजीव ठकरेले यांनी केले.कार्यक्रमाच्या आयोजनासाठी गोंडवाना पॉवर प्रोडयुसर कंपनी लिमिटेडचे सर्व संचालक,ग्रामपातळीवरील सदस्यांनी सहकार्य केले.

## सभासदांच्या माध्यमातून शेतकरी उत्पादक

**या प्रकल्पाला गवत पुरविण्याचे काम शेतकरी करणार असून शेतकरी उत्पादक कंपनी गठीत करण्यात आली आहे. गोंदिया पावर प्रोड्यूसर कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सभासद होण्याची संधी देण्यात आली आहे. तेव्हा या नाविण्यपूर्ण प्रकल्पाचे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सभासद व्हावे व होणाऱ्या आर्थिक प्रगतीचे भागीदार व्हावे, असे आवाहन महेंद्र ठाकूर यांनी केले आहे.**






## गावातच रोजगार निर्मिती होणार

**सध्या परिस्थितीत धान शेती शासकीय यंत्रणेवर अवलंबून आहे. तेव्हा या यंत्रणेवर अवलंबून न राहता कमीत कमी एकरी ५० हजार रूपयाचे उत्पन्न शेतकऱ्यांना मिळेल, अशी व्यवस्था या माध्यमातून करण्यात येईल. प्रत्येक ग्राम पंचायतमध्ये एक छोटे प्रोसोसिंग युनिट उभारण्यात येईल. ज्यामुळे गाव पातळीवर रोजगार निर्मिती व उत्पन्नाचे साधन तयार होऊन युवा उद्योजक गावात तयार आणि रोजगाराची संधी गावातच उपलब्ध होईल. सर्व नोंदणीकृत सदस्यांना शेतात गवत लावण्यासाठी बियाणे नि:शुल्क देण्यात येईल. तसेच जैविक शेतीसाठी प्रकल्पातून तयार होणार खत स्वस्त दरात शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.**

# नागपूर अधिवेशनाच्या तयारीसाठी विशेष कोविड प्रतिबंधात्मक नियोजन

**नागपूर :** महाराष्ट्र विधिमंडळाचे यंदाचे तिसरे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे सात डिसेंबरपासून प्रस्तावित आहे. याबाबतच्या तयारीचे नियोजन करण्यासाठी आज सर्व संबंधित विभागांची उच्चस्तरीय बैठक विधिमंडळाचे प्रधान सचिव राजेंद्र भागवत यांच्या अध्यक्षतेखाली झाली. कोविडच्या पार्श्वभूमीवर या अधिवेशनासाठी विशेष प्रतिबंधात्मक तयारी करण्यात येणार आहे.

नागपूर येथे विधानभवनातील मंत्रीपरिषद दालनात प्रधान सचिव श्री.भागवत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला विभागीय आयुक्त प्राजक्ता लवंगारे- वर्मा, जिल्हाधिकारी विमला आर , नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त राधाकृष्णन बी, अतिरिक्त पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश कुंभेजकर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक हेमराज बागुल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जनार्दन भानुसे, आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. संजय जायस्वाल यांसह विविध संबंधित विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

महाराष्ट्र विधान परिषद सभापतींचे सचिव म. मु. काज, उपसचिव राजेश तारवी,अवर सचिव रविंद्र जगदाळे, महाराष्ट्र विधान परिषद उपसभापती यांचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अनिल महाजन, विधानभवनाचे मुख्य सुरक्षा अधिकारी प्रदीप चव्हाण, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे जनसंपर्क अधिकारी तथा व सचिव सुनील झोरे, विधान भवनाच्या वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे संचालक निलेश मदाने, विधीमंडळाचे पध्दती विश्लेषक अजय सर्वणकर यांचीही यावेळी उपस्थिती होती. मुंबई येथे पुढील आठवड्यात विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक होणार आहे.त्यादृष्टीने आजच्या बैठकीत अनुषंगिक तयारीसाठी सर्व विभागाने केलेल्या प्राथमिक तयारीचा आढावा घेण्यात आला.

यंदाचे हिवाळी अधिवेशन कोरोना पार्श्वभूमीवर होत आहे. त्यामुळे त्यात सहभागी होणाऱ्या विधिमंडळ सदस्यांपासून तर कर्मचाऱ्यांपर्यत लसीकरणाचे दोन डोस पूर्ण असणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे अधिवेशनासाठी येणाऱ्या प्रत्येकाला आपल्यासोबत दोन्ही डोस घेतल्याचे प्रमाणपत्र आणणे आवश्यक करण्यात आले आहे. याशिवाय दोन्ही डोस घेतल्यानंतरही या अधिवेशनादरम्यान प्रत्येकाला पुन्हा आरटीपीसीआर टेस्ट करणे अनिवार्य असेल. त्यामुळे विधीमंडळ सदस्य, त्यांचे स्वीय सहायक, सर्व अधिकारी-कर्मचारी, वृत्तसंकलनासाठी येणारे माध्यम प्रतिनिधी, सुरक्षेसाठी तैनात असणारे पोलीस, राज्यभरातून येणारे वाहन चालक या सर्वांच्या आरटीपीसीआर टेस्ट अधिवेशन सुरू होण्यापूर्वी पूर्ण करण्याची महत्त्वपूर्ण सूचना श्री. भागवत यांनी आरोग्य विभागाला आज केली. कोरोना पार्श्वभूमीवर मर्यादित प्रवेश राहील. त्यामुळे विधिमंडळ परिसरात सभागृह सदस्यांच्या स्वीय सहायकांना प्रवेश दिला जाणार नाही. त्यांच्यासाठीची आवश्यक व्यवस्था परिसरात करण्यात यावी. याशिवाय सभागृहामध्ये "सोशल डिस्टंसिंग' राखायचे असल्यामुळे सदस्यांना एक आसन सोडून बसण्याची व्यवस्था लक्षात घेता यावेळी अभ्यागतांना कामकाज बघण्यासाठी प्रवेश दिला जाणार नाही.

तत्पूर्वी, विधिमंडळ परिसरात सुरक्षा व्यवस्थेसंदर्भात सर्वप्रथम चर्चा झाली. विधिमंडळ परिसरात नवीन इमारत कार्यान्वित झाली आहे. या इमारतीसाठी आवश्यक असणारी सुरक्षा व्यवस्था व अनुषंगिक उपाययोजना करण्याची सूचना यावेळी करण्यात आली. यासोबतच विधान भवन, विधान भवनाबाहेर परिसर, आमदार निवास, रविभवन, १६० खोल्यांचे गाळे, सुयोग पत्रकार निवास या ठिकाणच्या सुरक्षा व्यवस्थेबाबतचे निर्देश देण्यात आले. आमदार निवासामध्ये महिला आमदारांसाठी एक मजला राखीव ठेवण्यात यावा व विशेष पोलीस सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात यावी, असे निर्देशित करण्यात आले.

# जिल्ह्यातील दोन खेळाडूंची यू-मुंबा संघाच्या प्रशिक्षणासाठी निवड




**गडचिरोली–** पोलिस विभागाच्यावतीने नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या वीर बाबुराव शेडमाके कबड्डी स्पर्धा व खेळाडू निवड चाचणीमध्ये महाराणा प्रताप कबड्डी संघ गडचिरोलीचे खेळाडू आशिष समीर विश्वास व लिटील बॉइज क्लब भामरागड संघाचे खेळाडू जीवन सिताराम आतलामी यांची यु-मुंबा टीमच्या प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाली असून २० ऑक्टोंबर पासून अहमदाबाद येथे आयोजित प्रशिक्षण शिबिरात सहभागी होण्यासाठी दोन्ही खेळाडू रवाना झाले. या दोन्ही खेळाडुंचा जिल्हा पोलिस अधीक्षक अंकीत गोयल, अतिरिक्त जिल्हा पोलिस अधीक्षक समीर शेख, अतिरिक्त पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांचे उपस्थितीत अभिनंदन व सत्कार करून त्यांना रवाना करण्यात आल्यांची माहिती पोलिस दलाच्यावतीने आयोजित पत्रकार परिषदेतून दिली.

गडचिरोली पोलिस दलाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या पोलिस दादालोरा खिडकीच्या माध्यमातून कबड्डी स्पर्धेच्या आयोजनाचे पहिलेच वर्ष असून यात जिल्ह्यातील दहा पोलिस उपविभागांतर्गत दहा संघातील १२० खेळाडुंनी सहभाग नोंदविला होता. सदर स्पर्धा यु-मुंबा प्रो-कबड्डी स्पर्धेच्या संघासोबत आपसी सहकार्यासाठी करारबद्ध झालेली आहे. यु-मुंबाचे टीम लीडर संदीप सिंग व खेळाडू अजिंक्य कापरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आशिष विश्वास आणि जीवन आतलामी यांची पुढील प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली होती. हे दोन्ही खेळाडू २० ऑक्टोबर पासून पुढील एक महिन्यासाठी अहमदाबाद येथे प्रशिक्षण घेणार आहेत. या प्रशिक्षणातील त्यांच्या कामगिरीची चुणकू यु-मुंबा संघामध्ये त्यांचे स्थान निश्चित करणारी ठरणार आहे.

अतिरिक्त पोलिस अधीक्षक समीर शेख यांनी सांगितले की, पोलिस दादालोरा खिडकीच्या माध्यमातून गडचिरोली जिल्ह्यातील खेळाडुंसाठी कबड्डीसह इतर वैयक्तिक व सांघिक खेळांच्या स्पर्धाचे आयोजन पोलिसांच्या नागरी कृती शाखेच्या साहाय्याने यापुढे नियिमत करण्यात येणार आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील कतरुत्वान खेळाडुंना राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न गडचिरोली पोलिस विभागाच्यावतीने केला जाणार असल्याचे सांगितले.पत्रकार परिषदेला अतिरिक्त पोलिस अधीक्षक (अभियान) सोमय मुंडे, अहेरीचे पोलिस अधीक्षक अनुज तारे, सहायक पोलिस उपअधीक्षक भाऊसाहेब ढोले, नागरी कृती शाखेचे प्रभारी अधिकारी महादेव शेलार उपस्थित होते.

**पान १ वरुन**

### काही क्षणातच यादव यांचा राजीनामा

पालिकेच्या सभागृहात आयोजित विषय समिती सभापती पदाच्या निवडणुकी पूर्वी स्थायी समितीचे सदस्यांकरिता नावे मागविण्यात आले. नगरसेवक लोकेश यादव यांना न विचारता त्यांचे नाव स्थायी समितीमध्ये नाव समाविष्ट करण्यात आले. मात्र सभापती पदाच्या निवडणुकीत झालेले नवे राजकारण तसेच नाव समाविष्ट करतांना विश्वासात न घेता सदस्य पदावर वर्णी लावण्यात आली, असा उल्लेख करीत लोकेश यादव यांनी स्थायी समितीच्या सदस्य पदाचा राजीनामा मुख्याधिकाऱ्यांना दिला.

# चिपोटा येथे युवा स्वयंरोजगार संमेलन

**देवरी–** तालुक्यातील चिपोटा येथे काल रविवारी (दि.१७) ककोडीच्या श्रमिक गृह उद्योग आणि भौदीप स्कील डेवलपमेंट प्रा.लि. कंपनीच्या वतीने एक दिवसीय युवा स्वयंरोजगार संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.या संमेलनाचे उद्घाटन आमगाव देवरी विधानसभेचे सदस्य सहसराम कोरोटे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संदीप भाटिया, इंदल अरकरा, तालुका कृषी अधिकारी घनश्याम तोडसाम, सालेकसाचे मनोहर ऊईके, देवेन्द्र राऊत,मानेंद्र मोहबंशी, जिल्हा संसाधन व्यक्ती भौदीपजी शहारे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना आमदार कोरोटे म्हणाले की, उत्पादित मालाची विक्री करण्याकरीता सार्वजनिक कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रचार प्रसिद्धी करून विक्रीसाठी मदत करू श्री तोडसाम यांनी मार्गदर्शन करताना उपस्थितांना कृषी विभागाच्या अनेक कल्याणकारी योजनांची माहिती दिली. विविध पिकांतून मूल्यवर्धन करून जिल्ह्यात बाजारपेठ उपलब्ध

# जिल्हाधिकाऱ्यांचे स्वीय सहाय्यक मेमन लाच घेतांना जाळ्यात,जामिनावर सुटका



**गोंदिया –** गोंदिया जिल्हाधिकारी यांचे अतिरिक्त कार्यभार असलेले स्वीय सहाय्यक व दंड शाखेचे अव्वल कारकून राजेश अच्युत्तन मेमन यांना १३ आँक्टोबरला सायकांळी ६ वाजेच्या सुमारास १० हजार रुपयाची लाच घेतांना रंगेहाथ पकडण्यात आले होते.त्यानंतर न्यायालयात हजर केल्यावर न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आल्याने त्यांची भंडारा कारागृहात रवानगी झाली होती.याप्रकरणात शनिवार १६ आँक्टोंबरला मेमन यांना न्यायालयाने जामिन मंजुर केल्याने त्यांची जामिनावर सुटका झाली आहे.आता जिल्हाधिकारी मेमन यांना निलबिंत करुन कुठल्या ठिकाणी नियुक्ती देतात याकडेही लक्ष लागले आहे.

विशेष म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालयातील लाचलुचपत विभागाची आजपर्यंतची ही पहिलीच घटना होय.तक्रारदाराचे हार्डवेयर व भांडे विक्रीचे दुकान असून वडिलांच्या निधनानंतर वडिलांच्या नावे असलेल्या किरकोळ फटाका विक्री दुकान परवान्याचे नुतनीकरण व हस्तांतरण करण्याकरीता आवश्यक कागदपत्रासह अर्ज केला होता.परंतु मेमन यांनी याकरीता १० हजाराची मागणी केली होती.काही दिवसांनी परत तक्रारदार हे बँकेत ९०० रुपये भरल्याची चालान पावती जमा केली होती.

परत परवाना हस्तांतरणकरीता विचारपूस करायला गेले असता मेमन यांनी तक्रारदारास ११ हजार रुपयाची मागणी केली.परंतु तक्रारदारास लाच द्यायची मुळीच इच्छा नसल्याने त्यांनी १३ आँक्टोंबरला लाचलुचपत विभागात तक्रार नोंदवली.त्या तक्रारीची तत्काळ दखल घेत लाचलुचपत विभागाने सापळा रचत पंचासमक्ष १० हजाराची तडजोडी अंती मागणी करुन ती रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले.याप्रकरणात गोंदिया लाचलुचपत विभागाच्या वतीने गोंदिया ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करुन आरोपीस ताब्यात घेतले.ही कारवाई पोलीस उपअधीक्षक पुरुषोत्तम अहेरकर यांच्या नेतृत्वातील त्यांच्या चमूने केली.

विशेष म्हणजे गेल्या ६ आँक्टोंबर व १३ आँक्टोंबरच्या अंकात बेरार टाईम्सने जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागात गेल्या १०-१५ वर्षापासून प्रतिनियुक्तीवर आलेले कर्मचारी ठाण मांडून असल्याचे नावासह प्रकाशित केले होते.त्या यादीत राजेश मेमन यांचे नाव सुध्दा होते.ते देवरी तहसिल कार्यालयातून जिल्हाधिकारी कार्यालयात अव्वल कारकून म्हणून प्रतिनियुक्तीवर गेल्या १०-१५ वर्षापासून काम करीत आहेत.असे अनेक कर्मचारी याठिकाणी कार्यरत आहेत.एकाच जागेवर अधिक काळ राहिल्यास त्या पदाचा कसा प्रकारे गैरवापर होऊ शकतो याचे उदाहरण लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेली कारवाईच म्हणावी लागेल.

या प्रकरणानंतरही जिल्हाधिकारी कार्यालय या ठाण मांडून बसलेल्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे का आहे हे कळायला सध्या तरी मार्ग दिसत नाही.तरीही जिल्हाधिकारी प्रतिनियुक्तीवर गेल्या अनेक वर्षापासून ठाण मांडून बसलेल्यांना पुर्वीच्या ठिकाणी निष्पक्ष काम करीत हलवण्याची प्रकिया करणार की पुर्वीच्याच जिल्हाधिकारी सारखे आपल्याला काय काही दिवस काढून जायचे तर आहे असा विचार करीत यांना कायम ठेवण्यावर आपली सम्मंती देतात याकडे जनतेसह प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांचेही लक्ष लागले आहे.

# बोटे येथे २९४ पांढऱ्या धातुचे सिक्के मिळाले

**गोरेगाव –** तालुक्यातील बोटे या गावी प्रभाबाई शहारे वय ७० वर्षे यांचे जिर्ण जुने माट्टीचे घर फोडण्याचे काम चालू असतांना भिंतीतुन टिनाची जिर्ण पेटी दिसली ती पेटी बाहेर काढताच सन १८ ९० ते १९५० वर्ष लिहलेले व प्रिस नावाचे १ रुपयांचे २९४ पांढ-या रंगातील धातुचे सिक्के( ता ०३ आक्टोबर) आढळून आले. हे सिक्के खासगी घराच्या भिंतीत आढळुन आल्याने पोलीसात तक्रार दाखल करण्यात आली नव्हती परंतु लाला शहारे यांनी शनिवारी( ता १६) पोलीसात सिक्के मिळाल्याची तक्रार दाखल करताच तत्काळ पोलिसांनी २९४ सिक्के जब्त केले आहेत.




प्रभाबाई शालीकराम शहारे वय ७० वर्ष बोटे यांनी दिलेल्या माहितीनुसार जावई चंद्रशेखर अंताराम नंदेश्वर यांना घरकुल मंजुर झाल्याने घरकुलाचे बांधकाम जुने माट्टीचे घर सोडून उर्वरित जागेत घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले.जुने जिर्ण असलेले माट्टीचे घर घरकुलाच्या समोर असल्याने हे घर पाडण्यासाठी ललित राऊत, संजय राऊत यांना कंत्राटीवर काम दिले.त्यांनी ०३ आक्टोबरला जुने घर पाडण्याच्या कामाला सुरुवात केली. घर कौलारूअसल्याने इमला साहीत्य काढले व भिंती पाडण्याचे काम सुरू केले.त्यादरम्यान जमिनीपासून ५ फुट वरच्या भागातील भिंतीत एक जिर्ण टिनाची पेटी या मजुरांनी दिसली त्यांनी चंद्रशेखर नंदेश्वर यांना या पेटीची माहीती दिली. चंद्रशेखर नंदेश्वर यांनी भिंतीतुन पेटी बाहेर काढताच सिक्के खाली पडले.ते सिक्के पांढ-या रंगाचे (धातुचे)असुन त्यावर प्रिस १ रुपया इण्डिया सन १८९० ते १९५० या वर्षातील आढळले. त्यातील एका सिक्याचा वजन केल्यावर १० ते १२ ग्राम वजनाचे भरले. हे सिक्के पांढ-या रंगाचे असल्याने चांदीचे सिक्के मिळाल्याची चर्चा बोटे गावात पसरली. परंतु सिक्के मिळाल्याची माहिती पोलीसात देण्यात आली नव्हती. पांढ-या रंगाचे जुने सिक्के मिळाल्याची माहिती नागपूर निवासी लाला कान्हु शहारे यांना होताच वाटणीत हिस्सा घेण्याकरीता बोटे या गावी आला.ते सिक्के २९४ नसुन ६०० आहेत.उर्वरीत सिक्के दाखव असा तकादा चंद्रशेखर नंदेश्वर यांना लाला शहारे यांनी लावला असता जुने घर पाडण्याचे काम करणाऱ्या ललीत राऊत, संजय राऊत यांना बोलावून विचारणा करण्यात आली. परंतु लाला शहारे यांचे समाधान झाले नाही.

त्यामुळे त्यांनी शनिवारी (ता १६ ) चंद्रशेखर नंदेश्वर यांच्या विरोधात गोरेगाव पोलीसात तक्रार दाखल केली.पोलीसांनी तत्काळ कार्यवाही करीत चंद्रशेखर नंदेश्वर यांच्याजवळील २९४ सिक्के जब्त केले .पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**सिक्के १८९० ते १९५० या वर्षातील असल्याने ते चांदीचेच असावे.आजच्या बाजार भावाप्रमाणे लाखांच्या जवळपास किंमतीचे आहेत.असी चर्चा परिसरात होत आहे.नेमके हे कोणत्या धातुचे आहेत हे तपासणी झाल्यानंतर माहीती मिळणार आहे.**